# तुलनात्मक आधुनिक राजकीय व्यवस्था
# ई–संदर्भग्रंथ मालिका

## भाग १

## ब्रिटिश राजकीय व्यवस्था

लेखक
डॉ. निलेश र. निंबाळकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

तुलनात्मक आधुनिक राजकीय व्यवस्था ई—संदर्भग्रंथ मालिका
भाग १
ब्रिटिश राजकीय व्यवस्था

© डॉ. निलेश र. निंबाळकर
सहयोगी प्रोफेसर,
एम.ए, एम फिल, पीएचडी, सेट
श्री.कृ.को. महाविद्यालय जळगाव (जा.) बुलढाणा

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
H.P. Office (Source By Google)

❖ **Edition: Jan. 2021**

**ISBN** 978-93-90618-22-4

❖ **Price : 200/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

## लेखकाचे मनोगत

आजच्या आधुनिक काळामध्ये जगातील विविध राजकीय व्यवस्था यांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास आंतरविद्याशाखीय शास्त्रांमध्ये होऊ घातलेला आहे राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत विविध राजकीय व्यवस्थांचा तुलनात्मक अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले आढळून येते आजच्या करोना महामारी च्या पार्श्वभूमीवर आभासी पद्धतीने शिक्षणाला महत्त्व प्राप्त झालेले आहे आणि त्या अनुषंगाने विविध आधुनिक राजकीय व्यवस्थांचा आढावा घेण्याचा व त्या अंतर्गत विविध राजकीय व्यवस्थांचा विश्लेषणात्मक व वस्तुनिष्ठ पद्धतीने आढावा घेवून राज्य शासकीय तसेच स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासकांना आभासी स्वरूपामध्ये इ बुक संदर्भ ग्रंथ प्रकाशित करून विविध राजकीय व्यवस्थांची माहिती उपलब्ध करून देण्याचा मानस केलेला आहे. तुलनात्मक राजकीय व्यवस्था संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले त्या अंतर्गत भाग एक मध्ये ब्रिटिश राजकीय व्यवस्थेचा विश्लेषणात्मक व : वस्तुनिष्ठ प्रश्नांचा सुद्धा अंतर्भाव स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेला आहे अतिशय कमी वेळामध्ये या ई—पुस्तिकेच्या माध्यमा तून आपण ब्रिटिश शासन व्यवस्थेचा आढावा घेऊ शकतो

ब्रिटिश शासन व्यवस्था व्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश राजकीय व्यवस्था ही ई— पुस्तिका आज करोना महामारी च्या पार्श्वभूमीवर जेव्हा सगळीकडे ग्रंथालय हे बंद आहेत अशा काळामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्वरूपात या ई— पुस्तिकेच्या माध्यमातून आपले अध्ययन करता येईल या ई—पुस्तिकेच्या निर्मिती करता प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष ज्यांचे मला सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे तसेच ही ई—पुस्तिका प्रकाशित करून अभ्यासकां पर्यंत अभ्यासक्रम पोचविण्याचे कार्य केल्यामुळे मी हर्षवर्धन पब्लिकेशन चा सुद्धा आभारी आहे

**डॉक्टर नीलेश र. निंबाळकर**

## अनुक्रमणिका....


| | | |
|---|---|---|
| १) | ब्रिटिश संविधानाचा विकास व राज्यव्यवस्थेची वैशिष्ट्य | ०५ |
| २) | ब्रिटीश राजकीय व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये | १४ |
| ३) | ब्रिटनमधील कार्यकारी विभाग | १९ |
| ४) | ब्रिटिश पार्लमेंट | ४२ |
| ५) | ब्रिटनची न्यायव्यवस्था | ५५ |


❑❑❑

# 1

# ब्रिटिश संविधानाचा विकास व राज्यव्यवस्थेची वैशिष्ट्य

**प्रस्ताविक**

ग्रेट ब्रिटन अर्थात इंग्लंड हे युरोप खंडातील एक लहानसे राष्ट्र असून त्याच्या सभोवताल चारही बाजुंनी समुद्र आहे. अशा या छोट्या देशाने जागतिक राजकारणात जे शक्तीशाली स्थान प्राप्त केले. त्यामुळे ग्रेट ब्रिटन आज एक महत्वपूर्ण राष्ट्र बनलेले आहे. कार्यक्षम शासन, प्रजेचे नियंत्रण, नागरिक, स्वातंत्र्य याचा समन्वय इंग्लंडच्या व्यवस्थेत साधलेला आढळतो.

या दृष्टीकोनातून लोकशाही व्यवस्थांमध्ये अलिखित राज्यघटना असून सुध्दा ते एक आदर्श राष्ट्र आहे.सर्वप्रथम सांसदिय लोकशाहीची तेथेच निर्मिती झाली.त्यामुळेच या राज्यव्यवस्थेचा अभ्यास केल्याशिवाय राज्यशास्त्राच्या अभ्यासास पुर्णत्व येत नाही.

**१. उत्पत्ती व विकास**

इंग्लंड हे युरोपखंडातील एक लहानसे राष्ट्र असून जागतिक राजकारणात अतिशय महत्वपुर्ण बनलेले आहे. येथील शासन व राजकारणाचा अभ्यास करीत असताना निरंकूश राजेशाहीकडून मर्यादित राजेशाहीकडे परिवर्तन होत जावून पार्लमेंटची संप्रभुता (संसदेची सर्वोच्चता) निर्माण झालेली आहे.

इंग्लंडचे संविधान हे विकसीत संविधान असून त्याचा वेगवेगळ्या कालखंडात विकास होत जावून येथील शासन व राजकारणसुध्दा विकसीत होत गेलेले आहे. त्यामुळेच येथील शासन व राजकारणाची उत्पत्ती व विकास कशाप्रकारे होत गेला ते लक्षात घेऊ.

**रोमन काळ :-**

इंग्लंडमध्ये इ.स.पूर्व ५४ मध्ये केल्टोचे राज्य होते इ.स.पूर्व ५४ मध्ये तेथे रोमनांनी साम्राज्य प्रस्थापित केले.राजतंत्राची खऱ्या अर्थाने सुरवात याच काळात झाली शासन कारभारासाठी सात कबिल्यांमध्ये (सात भागांमध्ये) विभाजन केले. पुढे आलफ्रेडने

त्यांचे एकत्रिकरण करुन विशाल राज्याची स्थापना केली या काळात राजा अनियंत्रित नसून कार्यकुशलतेच्या आधारावर त्याची निवड होत असे विटेनाजीमॉट हे मंडळ राजाला राज्यकारभारात सहाय्य करीत असे तसेच त्याची नेमणूक व पदमुक्ती करीत असे.या मंडळात राजा, बिशप, पादरी, जहागिरदार व बुध्दीवादी वर्गाचा समावेश होता.

**नॉर्मन काळ :-**

पुढे विलीयम्स नॉर्मन वंशातील महत्वाकांक्षी राजाने सत्ता आपल्या ताब्यात घेवून सत्तेचे केंद्रीकरण केले याकाळातविटेनाजीमॉट चे रुपांतर मॅगनम कॉन्सिलीयम (महान व्यक्तींची परिषद) झाले

या मैगनम कॉन्सिलीयम मध्ये सुध्दा जमिनदार, धर्मगुरु राजाच्या विश्वासातील अशा लोकांचा सामावेश होता. ही कॉन्सिलीयम राज्याचे धोरण ठरवीने राज्याला सल्ला देते, कायदे तयार करते असी कार्य आपल्या अधिवेशनातुन पार पाडित असलेली आढळते.

या कालावधीमध्ये दुसरी विकसीत झालेली संस्था म्हणजे क्युरिया रेजीस हि क्युरिया रेजीस राजाला दैनंदिन कारभारामध्ये सल्ला देण्याच्या दृष्टीने निर्माण केल्या गेली. क्युरिया रेजीसचा प्रशासनिक कार्य करणारा विभाग म्हणजे प्रिव्ही कॉन्सील होय. पुढे यातुनच १७ व्या शतकात मंत्रीमंडळाची निर्मिती झाली.

**प्लेंटोजनेट काल (१२१५ च्या मॅग्नाकार्टा)**

१३ वे शतकाचे सुरुवातीस जॉन हा दुर्बल राजा इंग्लंडचा राजा बनला पुढे राजा विदीयमसच्या मृत्युनंतर अनेक वर्षे राज्यकारभार त्याच्याच पध्दतीने चालू होता. राजाजवळ सत्ताचे केंद्रीकरन होवुन राजाने अनियंत्रित स्वरुपात सत्ता वापरावयास सुरुवात केल्याने जमिनदार धर्मगुरु मध्ये असंतोस निर्माण झाला. त्यातुनच जमिनदाराने राजद्रोहास सुरुवात केली. त्यात एक अधिकार पत्र राज्याला प्रधान करण्यात आले.या अधिकार पत्राला मॅग्नाकार्टा (१५ जुन १२१५) असे म्हणतात. कालांतराने यातील सर्व सवलती सर्वसामान्य जनतेला प्राप्त झाल्यात व सिमीत राजतंत्रास प्रारंभ झाला. एक प्रकारे हा पार्लमेंटच्य विकासाचा प्रारंभ होय.

**संसेदेचा उगम :-** मॅग्नाकार्टा हि एक अधिकाराची एकप्रकारे संसद होती यामध्ये पुढील बाबी समाविष्ट होत्या

१) मॅगनम कान्सिलियमच्या परवानगीशीवाय जमीन दारांवर कर लावायचे नाही.

२) नागरिकाचा अपराध सिध्द झाल्या शिवाय अटक करता येणार नाही.

३) राजाचा चर्च मधील नियुक्त्यांमध्ये हस्तक्षेपास विरोध

४) मॅगनम कॉन्सिलीयमच्या बैठकांना पुर्वी प्रमाणेच धर्मगुरू व जमिनदारांना बोलविण्यात येईल.

५) परकीय व्यापाऱ्यांना सर्व साधारण परिस्थीतीत देशभर भ्रमण करता येईल. या महत्वपुर्ण मॅग्नाकार्टातील (अधिकारप्रत्र) तरतुदीमुळे राजाच्या अधिकारावर मर्यादा येवून मर्यादीत राजतंत्राच्या सुरुवातीची ही घटना एकप्रकारे नांदिय ठरली.

**गृहयुध्य व ट्यूटर वंशाचा कालखंड :-**

या काळात राजाचेच वर्चस्व होते.पार्लमेंटचे अधिवेशन सुध्दा नियमित होत नव्हते ट्यूटर सम्राट पार्लमेंट प्रतिनिधींना धमकावून आपल्याला हवे ते कायदे मंजूर करुन घेत होते थोडक्यात निरंकुश राज्यकारभार चालू होता. इंग्लडमध्ये चाललेल्या राजा व कान्सिलीयम (पार्लमेंट) यांच्या वर्चस्वाच्या लाडाई मध्ये पुढे इंग्लंडमध्ये गृहयुध्दास सुरुवात झाली या गृहयुध्दामध्ये शासन व्यावस्था पुर्णपणे विस्कळीत झालेली होती या युध्दात टयुडर वंशाचा विजय झाला या वंशाच्या राजांनी शांतता व सुव्यवस्था प्रचालित करित असतांनाच जनतेच्या समस्याकडे लक्ष पुरविल्या मुळे जनतेमधुन त्यांना पाठिंबा प्राप्त झाला जनतासुध्दा गृहयुध्दाला कंटाळली होती. शांतता व सुवेव्यस्थेसाठी तीने जरी टयुटर वंशाचे राजे आपल्या मनाप्रणानेच निर्णय घेत होते तरी राजाला विरोध केलेला दिसत नाही. त्यामुळे टयुडर वंशाचा कालखंड प्रामुख्याने शांततेत गेलाला आढळते या कालखंडात संविधातील विकासाच्य दृष्टीने फारशी प्रगती झालेली आढळत नाही.

**स्टुअर्ट कालखंड :-**

हा कालखंड इंग्लंडध्ये राजा व प्रजा (पर्लमेंट) चा संघर्ष होण्यास तसेच पार्लमेंट च्या आधिकाराचे हनन होण्यास कारनिभुत झालेला आढळतो. करण या कालखंडातील राजानी राज्य उदायाच्या दैवी अधिकाराच्या सिध्दाचा वापर करुन आपली सत्ता वापरण्यास सुरुवात केली परिणाम इंग्लंड मध्ये निरंकुश राजीशाही सुरु झाली. टयुडर वंशाची राणी हिचा १६०३ मधील मृत्युनंतर जेम्स स्टुअर्ट या राजाने दैवी अधिकाराच्या आधारे निरंकुशपने अधिकाराचा वापर केला तर स्टुअर्ट चार्ल प्रयम या राजाने अनेक वर्ष पार्लमेंटचे अधिवेशनय बोलाविले नाही आणि त्यातुन असंतोसाला सुरुवात झाली. व राजा व प्रजा यांच्यात संघर्ष सुरु झाला. अशातऱ्हेने ब्रिटनमध्ये विप्नोनीमॉट मॅगनम कॉन्सिलीयम क्युरिया रेजीस मॅग्ना कार्टा (१२१५) १४५५ चे गृहयुध्द १६८९ बील

ऑफराईटस १८३२ पार्लमेंह ॲक्ट १८३७, १८८४, १९११, १९१८, १९२८, १९४५, १९४८, १९४९ या विभिन्ना संख्या घटना व कायद्यावाटे इंग्लंडच्या अनियतीत राजतंत्राचे रुपांतर हळुहळु संसदीय लोकशाहीकडे होत जावुन ब्रिटीश व्यवस्थेचा विकास होत गेलेला आढळुन येतो आणि लोकशाहीच्या दृष्टीने जगामध्ये एक उत्तम संसदीय लोकशाही म्हणुन इंग्लंडची लोकशाही नावारुपाला आलेली आढळुन येते

**पार्लमेंटच्या (संसदेचा) उगम :-**

ब्रिटीश व्यवस्थेमधे पुढे जॉन राजाच्या काळात आर्थिक संकट निर्माण झाले त्यामुळे धार्मीक संकटाचा समाना करण्यासाठी राजाला जनतेच्या पाठीब्याची गरज वाटावयास लागली त्यामूळे त्याने मॅगनम कॉन्सिलीयम ज्यामध्ये जमिणदार, व्यापरी, धर्मगुरू राजघराण्यातील उच्च वर्गातील व्यक्तीचा सामावेश होता प्रत्येक काउन्टी मधुन चार प्रतिनीधी राहतील असा निर्णय घेतला त्यातुन आटी प्रथा प्रस्थापीत झाली की आर्थिक बाबतीतील निर्णय घेतांना जनतेच्या प्रतिनिधीची संमती घेणे आवश्यक राहिल.

१२५४ मध्ये राजा हेरि तृतीय या राजाने मॅगनम प्रतिनिधींना बैठकीसाठी पायारण केले येथुन इंग्लड मध्ये पार्लमेंट व्दिगृही बनण्याची प्रक्रिया सुरु झाली बैठकीमध्ये सर्वच वर्गातील प्रतिनिधीचा सामावेश असल्याने याला "आदर्श पार्लमेंट" संबोधल्या गेले. परंतु त्याचबरोबर मॅगनम कान्सिलीयम मधील उच्च वर्गातील जसे जमिणदार, व्यापारी, धर्मगुरू या प्रतिनिधींना सर्वसाधारण जनतेच्या प्रतिनिधीसोबत कमिपणाचे वाटावयास लागले. आणि त्यातुनच हे उच्च वर्गीय प्रतिनीधी वेगळे बसुन विचारविनिमय करावयास लागले छोटे जमिणदार कांउटिचे प्रतिनिधी वेगळे बसुन विचार विमयी करावयास लागले आणि मॅगनम कान्सिलीयमया पार्लमेंटचे विमाळन होवुन काउन्टीच्या प्रतिनिधी गृहाला हाउस ऑफ कामन्स असे नाव देण्यात आले एडवर्ड तृतीय या राजाच्या काळात या विमाळनास स्थायी स्वरुप प्राप्त झाल्याचे पहावयास मिळते.एडवर्ड तृतीय राज्याच्या कालखंडात (इ.स.१४४०) राजाने जनतेवर कर लावण्याची परवानगी देत असतांना पार्लमेंटने काही अटी लावुन ती परवानगी राजाला बहाल केली या मध्ये

१) करलावतांना पार्लमेंटची परवानगी घ्यावी
२) आर्थिक बाबींवर नियंत्रणायत्रि पार्लमेंट समिती यातिल
३) राजाला सवलत देणाज्या मंत्रीची निवड पार्लमटें करेल.

या काळात जेम्स पहिल्याच्या अनियंत्रीतराज्यकारभातून राजा व प्रजा संघर्ष सुरु झाला व संसदेने राजावर वर्चस्व प्रस्थापिन्यासाठी ट्रिलियल ॲक्ट मंजूर केला त्याचा परिणाम म्हणून इंग्लंडमध्ये गृहयुध्द होवून १६४८ मध्ये क्रॉमवेलने राजावर विजय मिळवून संसदेचे वर्चस्व प्रस्थापित झाले व त्यानंतरच्या राजांनी पार्लमेंटच्या संमतीनुसार राज्यकारभार केला पुढे जेम्स दुसऱ्याने अनियंत्रित बनण्याचा प्रयत्न केला त्याचा परीणाम १६८८ ची क्रांती झाली आणि ही क्रांती म्हणजे पार्लमेंटचा विजय होय. १६८९ च्या 'बिल ऑफ राईटस' ने पार्लमेंटची सर्वोच्यता राजानेसुध्दा मान्य केली. राज्याने पार्लमेटच्या विधेयकांना मान्यता द्यावी.पार्लमेंटच्या संमतीने सैनिक कारवाई करावी इ.बंधने राजावर आली 'ॲक्ट ऑफ सेटलमेंट' नुसार तर राजाचा उत्तराधिकारी ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटला प्राप्त झाला. पुढे पार्लमेंटमध्ये राजेशाहीचे समर्थन करणाऱ्या हाऊस ऑफ लॉडर्स या सभागृहाचे १९११ व १९४९ या कायद्यानुसार अधिकार मर्यादित होवून सर्व सामान्य जनतेचे प्रतिनिधत्व करणारे कॉमन्स सभागृह लोकाभिमुख होवून शक्तिशाली बनले.

चार्लस दुसऱ्याच्या काळात मॅग्नम कॉन्सिलीयमचे रुपांतर प्रिव्ही कौन्सिलियममध्ये झाले.तिची सदस्य संख्या फार मोठी झाली होती.त्यामुळे त्याने त्यातील क्लोयेर्ड, अर्लीग्टन, बर्कीगहॅम, रॅशले व लॅडरडेल या पाच सदस्यांना विचार विनिमयाकरिता निवडले.या मंडळातील व्यक्तींच्या नावाच्या आद्याक्षरावरुन कॅबॅल हे नांव दिले.त्यातुनच पुढे ते कॅबिनेट बनले.विलीयम तृतीयने एकाच पक्षाचे सभासद घ्यायला सुरवात केली.हॅनोवर वंशाच्या राजा जॉर्ज प्रथमने शासनकारभारात विशेष लक्ष दिले नाही.मंत्रिमंडळाच्या बैठकीस सुध्दा उपस्थित राहत नसे पर्यायाने जेष्ठ सदस्य म्हणून रॉबर्ट वॉलपोलनचे मंत्रिमंडळ बैठकीचे संचालन केले व तोच प्रधानमंत्री संबोधल्या गेला.

अश्यातऱ्हेने इंग्लंडमध्ये शासन कारभाराच्या दृष्टीने आवश्यक संस्था पार्लमेंट मंत्रिमंडळ काळाच्या ओघामध्ये विकसित होत गेलीत. सुरवातीला राजाचे समर्थक व विरोधक अस्तित्वात होते.पुढे त्याचे गट बनलेते टोरी व व्हिग या नावाने ओळखल्या गेले. जसजसे राजाचे अधिकार कमी होत. जावून पार्लमेंट सर्वोच्च बनत गेली. तसेच यागटांचे राजकीय पक्षात परिवर्तन झाले.कॉर्न्झवेटिव व उदारवादी हे पक्ष निर्माण झ ाले.सुरवातीला सत्ता या दोघांकडेच राहीली. त्यानंतर (लेबर) मजूर पक्ष उदयास आला आणि उदारवादी पक्षाचे महत्व कमी झाले व सत्ता कॉन्झवेटीव किंवा लेबर पक्षाकडे आलटून-पालटून गेली याबरोबरच कम्युनिस्ट पक्ष, नो नथिंग पक्ष, उदयास आलेत परंतू सत्ता दोनच पक्षांकडे राहील्याने येथे द्विपक्षपध्दती रुळलेली आढळते. .

**सवैधानिक संरचना (Constitutional Structure)**

इंग्लंडचे संविधान अलिखित असले तरी निरंकूश राजेशाहीचे मर्यादित राजेशाहीत रुपांतर होतांना, लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होतांना अनेक घटना घडल्या घोषणापत्र, दस्ताऐवज निघालेत यांनी सुध्दा रुढी प्रथा परंपराप्रमाणेच ब्रिटीश शासन व राजकारणाला एक नवा आकृतिबंध दिला म्हणजेच अलिखित रुढी प्रथा परंपराबरोबरच लिखित करार, दस्ताऐवज, घोषणापत्रांनी इंग्लंडच्या संविधानाला जे स्वरुप प्राप्त झाले. त्यास संवैधानिक संरचना असे म्हटल्या जाते.म्हणूनच त्या बाबींचा आपणास अभ्यास करावा लागतो. कुठल्याही देशाचा राज्यकारभार चालण्यासाठी संबोधानिक संरचनांची निर्मिती झालेली असते. राज्यकारभार व प्रशासनासाठी प्रामुख्याने कायदा त्यांची अंमलबजावणी व न्यायदान याबाबी आवश्यक असुन पुर्वी राजेशाहित हि सर्व कार्य राजा जवळ केंद्रीत झालेली होती व त्यातुच राजा पुढे अनियंत्रीत झालेला आढळतो. आणि त्याच्या त्या अनियंत्रीत वागण्यातुनच इंग्लंडमध्ये राजा विरुध्द पार्लमेंट प्रजा संघर्ष झाला आणि संघर्षामध्ये ब्रिटिश जनतेचा विजय होवून राजा ज्या अधिकारांमुळे अनियंत्रीत बनला ते अधिकार वास्तविकरित्या त्या सत्ता वापरण्याचा अधिकार काढून राजाला नाममात्र बनविण्यात येवून हळुहळु त्याच्या कायदेकारी कार्यकारी न्यायकारी सत्तांच्या प्रत्यक्षात वापरण्याच्या दृष्टीने ब्रिटनमध्ये रुढी प्रथा परंपरा व काही लिखीत कायद्यांच्या आधारे कायदेमंडळ (पार्लमेंट), मंत्रिमंडळ व न्यायमंडळ या संरचना अस्तित्वात आल्यात या संरचनांनीच ब्रिटनच्या राज्यव्यवस्थेला अलिखीत घटनेला एक संवैधानिक चौकट निर्माण झाल्याने या संरचनांना संवैधानिकसंरचना असे संबोधल्या जाते. या संरचनांचा आढावा पुढिलप्रमाणे आढळतो.

१) मॅग्नॉ कार्टा (१२१५) :- हे एक महत्वपूर्ण घोषणापत्र असून यामुळे राजाचे अधिकार कमी झालेत. हीच निरंकुश राजतंत्राची मर्यादित राजतंत्रात परिवर्तन होण्याची सुरवात होय.

२) पिटीशन ऑफ राईटस (१६२८) :- यातून राजावर मर्यादा आल्यांत राजाने पार्लमेंटच्या संमती शिवाय कर लावू नये, तसेच कुणालाही पकडू नये.

३) बिल ऑफ राईटस (१६८९) :- ब्रिटीश नागरिकांच्या स्वातंत्र्याला संरक्षण मिळाले. कुणालाही आरोप ठेवल्याशिवाय बंदी बनविल्या जाणार नाही.

४) हेबिअस कॉपर्स (१६७९) :- ब्रिटीश नागरिकांच्या स्वातंत्र्याला संरक्षण मिळाले, कुणालाही आरोप ठेवल्याशिवाय बंदी बनविल्या जाणार नाही.

५) विविध सुधारणा कायदे (१८१८,१८२८,१८३२,१८४८,१८६७) :- याद्वारे लोकप्रतिनिधीत्व ठरविल्या गेले, मताधिकारासंबंधी तरतूद केल्या गेली.

६) लोकल गर्व्हनमेंट ॲक्ट (स्थानिक स्वराज्य संस्था कायदे) (१८८८,१८९४,१९३१,१९४५,१९४८) :- यातून स्थानिक शासन व राजकारणाची व्यवस्था केल्या गेली.

७) १९११ व १९४९ चा सांसदिय कायदा :- याद्वारे लॉर्डस सभागृहाचे अधिकार कमीकरुन कॉमन्सचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात आले.

८) १९३७ चा मिनिस्ट्री ऑफ क्राउन ॲक्ट :- याद्वारे मंत्रिमंडळ पध्दतीला वैधानिकता प्राप्त झाली.

९) न्यायालयीन निर्णय :- विभिन्न कायदे तसेच घोषणापत्रांप्रमाणेच न्यायालयीन निर्णय सुध्दा सवैधानिक संरचना बनण्यास सहाय्यभूत ठरले येथे न्यायालये संविधान नियमांचा स्पष्ट अर्थ लावतात. उदा. ज्युरींची स्वतंत्रता, न्यायाधिशांची सर्वोच्चता न्यायालयीन निर्णयांमुळेच प्रस्थापित झाली.

१०) परंपरा आणि संकेत :- येथे परंपरा आणि संकेतांना कायद्याप्रमाणेच महत्वपूर्ण स्थान आहे. येथे शासन व राजकारणाअंतर्गत असणाऱ्या विभिन्न संस्था उदा. मंत्रिमंडळ, संसद, राजकीय पक्षपध्दती इ. यांची निर्मिती सुध्दा काळाच्या ओघामध्ये परंपरा व संकेतावर झालेली आहे. राजकीय व्यवहार वर्षानुवर्षे काही रुढींना अनुसरुन चालत राहतात. कालांतराने त्यांना अलिखित विधिनियमाचे रुप प्रात होते.

अशा अनेक बाबीमधूनच ब्रिटीश राजकीय व्यवस्थेला संवैधानिक रुप प्राप्त झाले आहे.

## List of Prime Ministers of the United kingdom

| Name | Term Of Office | Political Party | Name | Term Of Office | Political Party |
|---|---|---|---|---|---|
| Robert Walpole | १७२१-१७४२ | Whig | Earl Of Wilmington | १७४२-१७४३ | Whig |
| Henry Pelham | १७४३-१७५४ | Whig | Duke Of Newcastle | १७५४-१७५६ | Whig |
| Duke Of Devonshire | १७५६-१७५७ | Whig | Duke Of Newcastle | १७५७-१७६२ | Whig |
| Earl Of Bute | १७६२-१७६३ | Whig | George Grenville | १७६३-१७६५ | Whig |
| Marquess of Rockingham | १७६५-१७६६ | Whig | Earl Of Chatham | १७६६-१७६८ | Whig |
| Duke Of Grafton | १७६८-१७७० | Whig | Lord North | १७७०-१७८२ | Whig |
| Marquess of Rockingham | March १७८२-July १७८२ | Whig | Earl Of Shelburne | १७८२-१७८३ | Whig |
| Duke Of Portaland | April १७८२-१९ Dec १७८२ | Whig | Duke Of Portland | April १७८३-Dec १७८३ | Whig |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| William Pitt | १७८३-१८०१ | Tory | Henry Addington | १८०१-१८०४ | Tory |
| William Pitt | १८०४-१८०६ | Tory | Baron Grenville | १८०६-१८०७ | Whig |
| Duke Of Portland | १८०७-१८०९ | Tory | Spencer Perceval | १८०९-१८१२ | Tory |
| Earl Of Liverpool | १८१२-१८२७ | Tory | George Canning | April १८२७-Aug १८२७ | Tory |
| Viscount Goderich | १८२७-१८२८ | Tory | Duke Of Wellington | १८२८-१८३० | Tory |
| Earl Grey | १८३०-१८३४ | Whig | Viscount Melbourne | July १८३४-Nov १८३४ | Whig |
| Duke Of Wellington | Nov १८३४-April १८३४ | Whig | Robert Peel,Bt | १८३४-१८३५ | Conservative |
| Viscount Melbourne | १८३५-१८४१ | Whig | Robert Peel | १८४१-१८४६ | Conservative |
| Lord John Russell<br>Earl Of Aberdeen | १८४६-१८५२<br>१८५२-१८५५ | Whig<br>Peelite | Earl Of Derby<br>Viscount Palmerston | Feb १८५२-Dec १८५२<br>१८५५-१८५८ | Conservative<br>Whig |
| Earl Of Berby | १८५८-१८५९ | Conservative | Viscount Palmerston | १८५९-१८६५ | Liberal |
| Earl Russell | १८६५-१८६६ | Liberal | Earl Of Derby | १८६६-१८६८ | Conservative |
| Benjamin Disraeli | Feb१८६८-Dec१८६८ | Conservative | WilliamEwart Gladstone | १८६८-१८७४ | Liberal |
| Earl Of Beaconsfield | १८७४-१८८० | Conservative | WilliamEwart Gladstone | १८८०-१८८५ | Liberal |
| Marquess Of Salisbury | १८८५-१८८६ | Conservative | WilliamEwart Gladstone | Feb१८८६- July १८८६ | Liberal |
| Marquess of salisbury | १८८६-१८९२ | Conservative | Williamewart gladstone | १८९२-१८९४ | Liberal |
| Earl of rosebery | १८९४-१८९५ | Liberal | Marquess of salisbury | १८९५-१९०२ | Conservative |
| Arthur balfour | १९०२-१९०५ | Conservative | Henrycampbell bannerman | १९०५-१९०८ | Liberal |
| Herbert henry asquith | १९०८-१९१६ | Liberal | David lloyd george | १९१६-१९२२ | Liberal |
| Bonar law | १९२२-१९२३ | Conservative | Stanley baldwin | १९२३-१९२४ | Conservative |
| Ramsay macdonald | Jan१९२४-nov १९२४ | Labour | Stanley baldwin | १९२४-१९२९ | Conservative |
| Ramsay macdonald | १९२९-१९३५ | Labour /national labour | Stanley baldwin | १९३५-१९३७ | Conservative |
| Neville chamberlain | १९३७-१९४० | Conservative | Winston churchill | १९४०-१९४५ | Conservative |
| Clement attlee | १९४५-१९५१ | Labour | Winston churchill | १९५१-१९५५ | Conservative |
| Anthony eden | १९५५-१९५७ | Conservative | Harold macmillan | १९५७-१९६३ | Conservative |
| Alee douglas home | १९६३-१९६४ | Conservative | Harold wilson | १९६४-१९६६ | Labour |
| Edward heath | १९७०-१९७४ | Conservative | Harold wilson | १९७४-१९७६ | Labour |
| James callaghan | १९७६-१९७९ | Labour | Margaret thatcher | १९७९-१९९० | Conservative |
| Jahn major | १९९०-१९९७ | Conservative | Tony blair | १९९७-२००७ | Labour |
| Gordon brown | २००७-२०१० | Labour | David cameron | २०१०-२०१६ | Conservative |
| Theresa may | १३ july २०१६ incunbent | Conservative | | | |

# List of speakers of the british house of commons

| No. | Term of office | | Speakar | No. | Term of office | | Speakar |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७०७ | १७०८ | Sir john smith | १८ | १८५७ | १८७२ | John evelyn denison |
| २ | १७०८ | १७१० | Sir richard onslow | १९ | १८७२ | १८८४ | Henry brand |
| ३ | १७१० | १७१३ | William bromley | २० | १८८४ | १८९५ | Arthur wellesley peel |
| ४ | १७१४ | १७१५ | Sir thomas hanmer | २१ | १८९५ | १९०५ | William court gully |
| ५ | १७१५ | १७२७ | Sir spencer compton | २२ | १९०५ | १९२१ | James lowther |
| ६ | १७२८ | १७६१ | Sir arthur onslow | २३ | १९२१ | १९२८ | John henry whitley |
| ७ | १७६१ | १७७० | Sir john cust bt | २४ | १९२८ | १९४३ | Edward fitzroy |
| ८ | १७७० | १७८० | Sir flecher norton | २५ | १९४३ | १९५१ | Douglas difton brown |
| ९ | १७८० | १७८९ | Sir charles wolfran cornwall | २६ | १९५१ | १९५९ | William morrison |
| १० | १७८९ | | William wyndham grenville | २७ | १९५९ | १९६५ | Sir harry hylton foster |
| ११ | १७८९ | १८०० | Henry addington | २८ | १९६५ | १९७१ | Dr horace king |
| १२ | १८०१ | | Henry addington | २९ | १९७१ | १९७६ | Selwyn lloyd |
| १३ | १८०१ | १८०२ | Sir john mitford | ३० | १९७६ | १९८३ | George thomas |
| १४ | १८०२ | १८१७ | Charles abbot | ३१ | १९८३ | १९९२ | Bernard weatherill |
| १५ | १८१७ | १८३५ | Charles manners sutton | ३२ | १९९२ | २००० | Betty boothroyd |
| १६ | १८३५ | १८३९ | James abercromby | ३३ | २००० | २००९ | Michael |
| १७ | १८३९ | १८५७ | Charles shawlefevre | ३४ | २००९ | | John bercow |

## List Of British Monarchs

| Name reign | Name reign | Name reign |
| --- | --- | --- |
| Anne<br>१ may १७०७-१ august १७१४ | George IV<br>George augustus frederick<br>२९ jane १८२० - २६ june १८३० | George V<br>George frederick ernest albert<br>६ may १९१०- २० jan १९३६ |
| George I<br>George louis<br>१ August १७१४- ११ june १७२७ | William IV<br>William Henry<br>२६ june १८३०-२० june १८३७ | Edward VIII<br>Edward albert christian george<br>andrew paririck david<br>२० jan १९३६- ११ dec १९३६ |
| George II<br>George augustus<br>११ june १७२७ - २५ Oct १७६० | Victoria alexandrina victoria<br>२० june १८३७ २२ jan १९०१ | George VI<br>Albert frederick arthur george<br>११ dec १९३६- ६ feb १९५२ |
| George III<br>George william frederick<br>२५ Oct १७६०-२९ jan १८२० | Edward VII<br>Albert edward<br>२२ jan १९०१ ६ may १९१० | Elizabeth II<br>Elizabeth alexandra mary<br>६ feb १९५२ - Present |

❑❑❑

2

# ब्रिटीश राजकीय व्यवस्थेची ठळक वैशिष्टये

## (Salient Features)

कोणत्याही देशाचे शासन आणि राजकारण लिखित किंवा अलिखित नियमांच्या आधारावर चालत असते.त्या नियमांना संविधान संबोधल्या जाते.प्रत्येक संविधानाची निर्मिती किंवा विकास तेथील सामाजिक, भौगोलिक, आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने झालेला असतो. आणि त्यामुळे प्रत्येक संविधानाची स्वत:ची काही वैशिष्टे निर्माण झालेली असतात. काळाच्या ओघात विकसित झालेल्या ब्रिटीश संविधानाची आपणास ओळख होते ती वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहे.

**पंरपरागंत संविधान :-**

इंग्लंडचे संविधान हे परंपरागत संविधान आहे.कारण काळाच्या ओघामध्ये तयार झालेल्या रुढी, प्रथा द्वारे यांची निर्मिती झालेली असून अनेक वर्षापासूनच्या त्या रुढी प्रथा परंपरा आहे.

**अलिखित संविधान :-**

ज्या संविधानाची निर्मिती घटना मंडळाद्वारे विशिष्ट कालखंडामध्ये झालेली नसते ते संविधान अलिखित असते.इंग्लंडचे संविधान सुध्दा घटनामंडळाद्वारे निर्माण झालेले नसून काळाच्या आवश्यकतेनुसार तयार झालेल्या रुढी प्रथा संकेताद्वारे विकसीत झालेले आहे.त्यामुळेच ते अलिखित आहे.

**एककेंद्री शासन :-**

इंग्लंडमध्ये सर्व सत्ता एकाच ठिकाणी म्हणजेच केंद्रशासनाजवळ केंद्रीत झालेल्या आहेत.येथे स्थानिक सरकारांना स्वतंत्र अधिकार नाहीत.संपूर्ण प्रदेशासाठी एकच मंत्रिमंडळ व कायदेमंडळ आहे.त्यामुळेच येथे एककेंद्री शासनव्यवस्था आढळते.

**सांसदीय शासन प्रणाली :-**

इंग्लंडमधील शासनप्रणाली सांसदीय प्रकारची आहे. सांसदीय शासन प्रणाली अंतर्गत नाममात्र व वास्तविक अशा दोन प्रमुखांची निर्मिती झालेली असते.त्यानुसार

ब्रिटनमध्ये सुध्दा राजा नाममात्र शासक आहे.म्हणजेच त्यांच्याच नावाने राज्यकारभार चालतो.सर्व सत्ता त्यालाच प्राप्त झालेलया आहे. मात्र तो स्वत: राज्यकारभार करीत नाही. तर राज्यकारभार प्रधानमंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ करीत असते.म्हणून मंत्रिमंडळ वास्तविक शासक आहे.तसेच सांसदीय पध्दतीप्रमाणे येथे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांचा परस्पर संबंध आहे.कार्यकारी मंडळ म्हणजेच मंत्रिमंडळाचे सदस्य कायदेमंडळांचे सभासद असतात ते कायदेमंडळात विधेयक मांडतात. चर्चेत भाग घेतात. तसेच कायदेमंडळ मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव आणून त्यांना पदमुक्त करु शकते.

**पार्लमेंटची सर्वोच्चता:-**

इंग्लंडमध्ये भारत व अमेरिकेप्रमाणे घटनेची सर्वोच्चता निर्माण झालेली नाही तर पार्लमेंटची सर्वोच्चता आढळते.म्हणजेच येथे पार्लमेंटचा कायदा रद्द करण्याचा अधिकार कुणालाही नाही.पार्लमेंटच्या सार्वभौमत्वाविषयी असे म्हटल्या जाते की, इंग्लंडची पार्लमेंट पुरुषाला स्त्रिच बनवू शकत नाही.जगात एवढे शक्तीशाली पार्लमेट कोणतेही नाही.येथे राजा सुध्दा पार्लमेंटचे विधेयक परत पाठवू शकत नाही.

**सत्तेचे आवंटन (Allocation of Power) :-**

इंग्लंडच्या शासनव्यवस्थेचे वैशिष्टे म्हणजे येथे सत्तेचे विभाजन नसून सत्तेचे आवंटन करण्यात आलेले आहे.त्यानुसार कायदेकरण्याच्या सत्ता कायदेमंडळाकडे, अंमलबजावणीच्या सत्ता मंत्रिमंडळाकडे तर न्यायदानाच्या सत्ता न्यामंडळाकडे देण्यात आलेल्या आहेत.येथे स्वतंत्र न्यायमंडळ नसून पार्लमेंटचे एक सभागृहच (House of Loards) न्यायदानाचे कार्य करते.

**कायद्याचे राज्य (Rule of Law) :-**

इंग्लडच्या राजकिय व्यवस्थेचे हे एक महत्वपुर्ण वैशिष्टये ठरते कारण येथे सर्वांसाठी समान कायदा असून कायद्यासमोर सामान्य माणूस व महत्वपूर्ण पदावरील व्यक्ति समान आहेत.कायद्यानुसार एकाच गुन्ह्यासाठी सर्वांसाठी समान कायदा आहे.कायद्यानुसार एकाच गुन्ह्यासाठी सर्वांसाठी समान शिक्षा आहे.

**द्विपक्ष पध्दती :-**

इंग्लंडमध्ये शासन संस्थांच्या विकासाबरोबरच पक्ष पध्दतीचा विकास होत गेला येथे प्रथम राजाचे समर्थक व विरोधक असे गट अस्तित्वात होते.पुढे या गटाचेच राजकिय पक्षात रुपांतर झाले.त्यानुसार हुजूर (कॉन्झर्वेटिव्ह) व उदारवादी (लिबरल) पक्ष उदयास आले.पुढे मजूर (लेबर) पक्षाची निर्मिती झाली व सत्ता सतत मजूर व हुजुर

पक्षाकडेच राहीली येथील जनतेने सतत दोनच पक्षांना समर्थन दिल्याने येथे द्विपक्षपध्दती अस्तित्वात आली.

**तत्व व व्यवहारात फरक :-**

इंग्लंडमध्ये जे तत्वानुसार आढळते व्यवहारात मात्र त्याप्रमाणे कार्य होतांना आढळत नाही.उदा. येथे सर्व सत्ता ब्रिटीश राजाचे नावे चालते मात्र व्यवहारात राजा स्वत: कोणत्याही सत्तेचा वापर करीत नाही. तर सत्तेचा वापर प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ करते.

**रुढी, परंपरा संकेतांना महत्व :-**

इंग्लंडच्या शासन व्यवस्थेचे हे महत्वपूर्ण वैशिष्ट ठरते.कारण या संपूर्ण शासन व्यवस्थेचा विकासच मुळात रुढी प्रथांद्वारे झालेला असून या रुढी व प्रथा कांलातराने संकेत बनल्या व त्यांना अलिखित नियमांचे रुप प्राप्त झाले. जनता रुढी प्रथा संकेतांचे नियमाप्रमाणे पालन करते. येथे एखाद्या रुढी प्रथेचे उल्लंघन झाल्यास राजकीय व्यवस्थाच कोसळू शकते.

**मिश्र शासनव्यवस्था :-**

इंग्लंडची शासनव्यवस्था मिश्रीत स्वरुपाची आहे.कारण येथे सांसदीय लोकशाही असुनही सर्वोच्च प्रमुखराजा आहे व तो वंशपरंपरेने पदावर येतो.म्हणजेच राजेशाही अस्तित्वात आहे.तर श्रीमंत, भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह (House of Loards) अस्तित्वात आहे.म्हणजेच लोकशाही, राजेशाही व कुलीनंतत्राचे येथे मिश्रण आढळते.

अशा तऱ्हेने इंग्लंडच्या शासन व राजकारणाची वैशिष्टे आढळतात.यावरुन इंग्लंडच्या शासन व्यवस्थेचे स्वरुप आपणास लक्षात येते.

**ब्रिटीश संविधान ऐतिहासिक विवेचन व वैशिष्ट्ये**

१. ब्रिटिश संविधानाचे स्वरुप कसे आहे ?
   अ) लिखीत ब) अलिखीत क) परिदृढ ड) यापैकी नाही

२. ब्रिटनचे संविधान कशाप्रकारचे आहे ?
   अ) विकसीत ब) अविकसीत क) लिखीत ड) यापैकी नाही.

३. मॅग्नाकार्टा कधी निर्माण केल्या गेले ?
   अ) इ.स.१६८८ ब) इ.स.१३२५ क) इ.स.१२१५ ड) इ.स. १६४८

४. मॅगनम कॉन्सिलीयम कधी अस्तित्वात आले?

अ) इ.स.१२१५ ब) इ.स.१२१४ क) इ.स.१२१६ ड) इ.स. १२१३

५. इंग्लडमध्ये राजाविरोधात क्रांती कधी झाली ?

अ) इ.स.१५१२ ब) इ.स.१२१५ क) १६८८ ड) इ.स. १६४८

६. ब्रिटनचे प्रथम प्रधानमंत्री म्हणुन कुणाला संबोधल्या जाते ?

अ) मार्गारे थॅचर ब) डेव्हीड कॅमरुन क) थेरेसा मेड) रॉबर्ट वॉलपोल

७. पीटीशन ऑफ राईट कोणत्या साली मंजुर झाला ?

अ) इ.स १६२८ ब) इ.स. १६८८ क) इ.स. १६४८ ड) इ.स. १६८९

८. बिल ऑफ राईटस कधी मंजुर झाले ?

अ) १६२८ ब) इ.स. १६८९ क) १६८८ ड) १२१५

९. ब्रिटीश राज्यघटनेचा महत्वपुर्ण आधार कोणता ?

अ) रुढी प्रथा परंपरा ब) नियम क) कायद ड) यापैकी नाही

१०. ब्रिटीश व्यवस्थेचे वैशीष्ट्य कश्याप्रकारचे आहे ?

अ) एककेंद्री ब) परिवर्तनीय

क) एकेरी राज्यघटना ड) वरील सर्व

११. ब्रिटनमध्ये कोणता शासनप्रकार अस्तित्वात आहे ?

अ) हुकुमशाही ब) सांसदीय लोकशाही

क) सर्वंकषवादी ड) साम्यवादी

१२. बिटनमध्ये एकाचवेळी कोणत्या शासनप्रकारचे संमिश्रण आढळते ?

अ) राजेशाही व सर्वंकषवादी ब) लोकशाही व सर्वंकषवादी

क) राजेशाही,लोकशाही व कुलीनतंत्र ड) यापैकी नाही

१३. ब्रिटीश राज्यव्यवस्थेचे वैशीष्ट्ये कोणते ?

अ) स्वतंत्र न्यायपालीका ब) न्यायालयाची सर्वोच्यता

क) स्वतंत्र व सर्वोच्च न्यायालयाचा अभाव ड) यापैकी नाही

१४. ब्रिटीश व्यवस्थेची वैशीष्ट्ये कोणती ?

अ) एकेरी राज्यघटना ब) एकेरी नागरीकत्व

क) जनतेचा पुराणमतवादी स्वभाव ड) वरील सर्व

१५. ब्रिटनमध्ये कायद्याचे राज्य आहे असे का म्हटले जाते ?

अ) सर्वांसाठी समान कायदा ब) घटनात्मक कायद्याची निर्मिती

क) जाती धर्म परत्वे वेगवेगळे कायद ड) यापैकी नाही

१६. प्रिव्ही कॉन्सीलचे रुपांतर कशात झाले ?
अ) पार्लमेंट ब) न्यायालय
क) मंत्रिमंडळ ड) यापैकी नाही

१७. कोणत्या राजाच्या अनियंत्रीत राज्यकारभारातुन राजा व प्रजा संघर्ष सुरु झाला?

१८. अ) ट्युटर ब) जेम्स पहिला क) नार्मन ड) यापैकी नाही

१९. मॅग्नाकार्टा कशाशी संबंधित आहे.
अ) राजाचे अधिकार वाढलेत ब) मॅग्नम कॉन्सिलीयमची निर्मिती
क) राजाचे अधिकारावर मर्यादा ड) मंत्रिमंडळ निर्मिती

२०. ब्रिटनमधील संविधानीक संरचना कोणती आहे.
अ) बिल ऑफ राईट्स ब) मॅग्नाकार्टा
क) पिटीशन ऑफ राईट्स ड) वरील सर्व

२१. ब्रिटनमध्ये नागरिकांना स्वातंत्र्ये कशाद्वारे प्राप्त झालीत ?
अ) मॅग्नाकार्टा ब) प्रिव्हीकॉन्सील
क) मिनीस्ट्री ऑफ क्राऊन ॲक्ट ड) बिल ऑफ राईट

❑❑❑

**3**

# ब्रिटनमधील कार्यकारी विभाग

## (Executive) (राजा व राजपद, मंत्रीमंडळ व प्रधानमंत्री)

ब्रिटीश व्यवस्थेचा अभ्यास करतांना ब्रिटनमध्ये प्रारंभी निरंकुश राजेशाही होती.पुढे त्याविरोधात क्रांती होवुन लोकशाही संस्थांचा विकास झालेला आढळतो.हा विकास होत असतांना ब्रिटनमधील जनतेनी राजेशाहीला नाममात्र बनविले म्हणजेच राजा जवळील अधिकार व सत्ता लोकशाही संस्थांकडे हस्तांतरीत केले आहे.परंतु राजेशाही नष्ट केली नाही. त्यामुळेच तेथे कार्यकारी विभागाअंतर्गत नाममात्र सर्वोच्च प्रमुख म्हणुन राजाचा आढावा घेतांना त्याच्या अधिकार व सत्तांचा वास्तविक स्वरुपात वापर करणाऱ्या मंत्रिमंडळ व प्रधानमंत्रीपदाचा कार्यकारी विभागा अंतर्गत अभ्यास करावा लागतो.

**ब्रिटिश राजा व राजपद :-**

ब्रिटीश शासन आणि राजकारणाचा अभ्यास करीत असतांना येथे सांसदीय लोकशाही अंतर्गत देशाचे शासन व राजकारण चालविण्यासाठी कार्यकारी विभाग अस्तित्वात असलेला आढळतो.येथे सांसदीय पध्दती असल्या कारणाने देशाचा प्रमुख व शासनाचा प्रमुख असे दोन प्रमुख आढळतात.त्यानुसार येथे राजा हा देशाचा सर्वोच्च प्रमुख असून त्याच्याच नावाने राज्यकारभार चालतो. सर्व सत्ता त्यालाच प्राप्त झालेल्या आहेत असे असले तरी तो स्वत: कोणत्याही सत्तेचा स्वत: वापर करु शकत नाही. त्यामुळेच त्याचे स्थान नाममात्र प्रमुखाचे आहे.

राजाचा सर्व सत्तांचा वापर करण्याकरिता येथे काळाच्या ओघात मंत्रिमंडळ विकसित होत जावून प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ राजाच्या सर्व सत्तांचा प्रत्यक्ष वापर करायला लागेल त्यामुळेच त्याचे स्थान वास्तविक शासकाचे बनले तयामुळेच इंग्लंडच्या शासन राजकारणाचा अभ्यास करतांना कार्यकारी विभागाअंतर्गत पुढील दोन शासन प्रमुखांचा अभ्यास करावा लागतो.

अ) राजा आणि राजपद (Kings & Crown)

ब) ब्रिटीश मंत्रिमंडळ

**अ) राजा आणि राजपद (Kings & Crown)**

ब्रिटीश शासन आणि राजकारणात राजपदाचे अतिशय महत्व आहे.लोकशाही असलेल्या इंग्लंडमध्ये आजही राजा सार्वभौम आहेव लोकशाही विरोधी वंशपरंपरेने राजाची निवड केल्या जाते.

सुरुवातीला येथे राजा सर्व सत्ताधिश होता. परंतू पुढे राजा आणि कायदेमंडळ ह्यांच्यात सत्तेच्या बाबतीत संघर्ष निर्माण झाला आणि १६८८ मध्ये क्रांती होवून राजाचा पराभव झाला व संसदेची सर्वोच्यता प्रस्थापित झाली. परंतू या परिवर्तनामध्ये जनतेने राजाचे अधिकार मर्यादीत केले.मात्र राजा हे पद नष्ट केले नाही.

आजही इंग्लंडमध्ये राजाच सार्वभौम आहे.तोच न्यायाचा उद्‌गाता समजल्या जातो.विधेयकांना त्याची संमती आवश्यक असते.राजा जो पर्यंत राजवाडयात आहे.तो पर्यंत ब्रिटन सुरक्षित आहे. असा आजही ब्रिटीश जनतेचा समज आहे. अशा तऱ्हेने राजा आजही तत्वत: सर्वोच्च आहे. परंतू प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मात्र तो काहीच नाही.सर्व सत्ता मंत्रिमंडळच वापरते राजाने कसा राज्यकारभार करावा, वारसदार, याबाबतीत कायदेमंडळच निर्णय घेते.

राजा ज्यावेळेस निरंकुश होता.तेव्हा शासनाची सर्व सत्ता राजा किंवा राणीला प्राप्त होत असे पुढे राजा व पार्लमेंट यांच्यात संघर्ष झाला आणि ब्रिटीश जनतेने राजाच्या सत्ता काढून घेतल्या मात्र राजपद नष्ट केले नाही.त्या सत्ता राजपदात समाविष्ठ झाल्यात आणि संसद सार्वभौम बनली आणि त्यामुळेच क्रांतीनंतर राजा आणि राजपद एक राहीले नाही.त्यामुळेच राजा आणि राजपदाचा अभ्यास करतांना त्यामध्ये कोणता फरक आहे. तो लक्षात घेणे आवश्यक ठरतो

**राजा व राजपदातील फरक :-**

**राजा व्यक्ती तर राजपद संस्था आहे. :-**

प्राचीन काळी राजा सर्वसत्ताधिश होता राजा बदलल्यास सत्तेत फरक पडायचा परंतू आता राजा नाममात्र असून सत्ता राजपद या संस्थेकडे आहे.त्यामुळे राजपदावर कोणीही व्यक्ती येवो.सत्तेत फरक पडत नाही.राजा ही एक जिवंत व्यक्ती आहे.तर राजपद ही काल्पनिक संकल्पना आहे.

**राजा मर्त्य आहे तर राजपद चिरंजीव :-**

राजा व्यक्ती असून व्यक्ती सजीव असल्याने राजाचा मृत्यु होतो.परंतू राजपद काल्पनिक असल्याने ते चिरंजीव आहे.

**राजासार्वभौम नाममात्र सत्ताधिश राजपद सर्वसत्ताधिश :-**

राजाला सर्व सत्ता प्राप्त झालेल्या असल्या तरी प्रत्यक्षात सर्व सत्ता कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळच वापरते. राजा स्वमताने कोणत्याही सत्तेचा स्वत: वापर करु शकत नाही. त्यामुळे राजा सार्वभौम नाममात्र सत्ताधिश आहे.

**राजा राज्य करतो परंतू राज्यकारभार करीत नाही :-**

ब्रिटनमध्ये राज्याच्या नावाने सर्व सत्ता चालते.त्याच्या सही व शिक्याशिवाय कायदा तयार होत नाही.म्हणजेच तो राज्य करतो. परंतू तो स्वत: कोणताही निर्णय घेवू शकत नाही. त्याला मंत्रिमंडळाच्या सहाय्यानेच राज्यकारभार करावा लागतो.सर्व निर्णय विभिन्न खात्याचेच मंत्री घेतात.त्यामुळे तो राज्यकारभार करीत नाही.

वरील विभिन्न मुद्यांवरुन राजा आणि राजपद यामध्ये फरक आढळतो.

**राजा किंवा राजपदाचे अधिकार :-**

राजाचे जे अधिकार आहेत.तेच आता राजपदाचे अधिकार होत.क्रातीपूर्वी सर्व अधिकार राजा/राणीचे होते.परंतू १६८८ च्या क्रांतीनंतर राजा/राणीचे अधिकार मर्यादीत झाले.ते राजपदाला प्राप्त झाले.त्याला वैयक्तिक अधिकार सुध्दा राहीले नाहीत.खाजगी जिवनाविषयी सुध्दा स्वातंत्र्य राहीले नाही.राजा किंवा राजपदाचे जे अधिकार आहेत.ते पुढील प्रमाणे आढळतात.

**कार्यकारी अधिकार :-**

यालाच शासनविषयक किंवा प्रशासकिय अधिकार म्हणतात.कार्यकारी प्रमुख किंवा देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणून कार्यकारी अधिकाराअंतर्गत राजाला पुढील कार्ये करावी लागतात. या नियुक्त्यांमध्ये पंतप्रधान, मंत्रि न्यायाधीश, सैन्य दलातील अधिकारी परराष्ट्रामधील प्रतिनीधी जसे राजदुत वकील इ. याचा समावेश होतो याबरोबरच देशाचे शासन चालविणे, देशांतर्गत महत्वपूर्ण नियुक्त्या करणे, पदव्यांचे वाटप करणे, शासनावर देखरेख ठेवणे, राष्ट्रमंडळाच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे.

**कायदेकारी अधिकार :-**

राजा कार्यकारी विभागाप्रमाणेच कायदेविभागाचा सुध्दा प्रमुख आहे. आणि त्या दृष्टीनेच राजाला या अंतर्गत पुढील अधिकार आहे. कायदेमंडळाचे अधिवेशन

बोलाविणे, स्थागित करणे, कॉमन्स सभागृह बरखास्त करणे, विधेयकाला मंजुरी देणे, अधिवेशनात उद्घाटनपर अभिभाषण करणे, अध्यादेश काढणे, इ.कार्य करावी लागतात. येथे राजाची मंजुरी मिळेपर्यत विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत नाही परंतु राजाची मंजुरी औपचारीक ठरते करण पार्लमेंटने मजुर केलेल्या विधेयकाला राजाला विरोध करण्याचा अधिकार नाही

**परराष्ट्रीय अधिकार :-**

देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणून परराष्ट्रीय क्षेत्रांतर्गत सुध्दा ब्रिटीश राजाला काही अधिकार मिळालेले आहेत. त्यानुसार देशाचे परराष्ट्रीय धोरण ठरविणे, वसाहतीचे धोरण ठरविणे, परराष्ट्राशी युध्द पुकारणे तह करणे, परराष्ट्रात ब्रिटनचे प्रतिनिधी पाठविणे, परत बोलाविणे, परराष्ट्रीय प्रतिनिधींना संमती देणे. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये इंग्लंडचे प्रतिनिधीत्व करणे. इ.

**सैन्यविषयक अधिकार :-**

तिन्ही सैन्यदलाचा सरसेनापती म्हणून सुध्दा या क्षेत्रात काही अधिकार राजाला आहे.त्यानुसार प्रमुख अधिकाऱ्याच्या नियुक्त्या करणे, सैन्यात भरती किंवा कपात करणे लष्करी कारवाईचा आदेश देणे.

**अर्थविषयक अधिकार :-**

आर्थिक क्षेत्रात काही अधिकार प्राप्त झालेले आहे.त्यानुसार अर्थविधेयक मांडण्यास परवानगी देणे, व त्यानुसार अंमलबजावणी होते किंवा नाही ते पाहणे.

**न्यायविषयक अधिकार :-**

इंग्लंड मध्ये राजा न्यायाचा निर्माता समजल्या जातो.त्यामुळे न्यायविषयक अंतिम सत्ता त्यालाच आहेत. परंतु न्यायालय अस्तित्वात आल्याने त्याला या क्षेत्रात मर्यादीत अधिकार राहीले. त्यानुसार न्यायधिशांच्या नियुक्त्या करणे, पार्लमेंटच्या संमतीनुसार त्यांना पदमुक्त करणे तसेच सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेल्या व्यक्तीच्या शिक्षा रद्द करणे, कमी करणे, बदलणे किंवा लांबणीवर टाकणे.

अश्या प्रकारे ब्रिटनमध्ये राजाला विभिन्न क्षेत्रांतर्गत अधिकार प्राप्त झालेले आढळत असले.तरी प्रत्यक्ष व्यवहारात या सर्व अधिकारांचा वापर मंत्रिमंडळच करीत असते. म्हणुन ब्रिटन चा राजा नाममात्र शासनप्रमुख बनलेला आढळतो.

**राजाचे व्यक्तिगत अधिकार :**

इंग्लंडमध्ये राजाचे स्थान काळाच्या ओघात नाममात्र शासन प्रमुखाचे बनले असुन त्याच्या त्या अधिकार व सत्तांचा वापर प्रधानमंत्री व मंत्रीमंडळ करतांना आढळते. आणि त्यामुळे राजा अधिकारांच्या दृष्टीने शक्तीहीन राष्ट्रप्रमुख बनलेला आहे.

१) सल्ला देणे : राजा अनेक वर्षे पदावर असतो त्यातुलनेत मंत्रीमंडळ सतत बदलत असते. आपलया अनुभवाच्या आधारावर राज्यकारभार करतांना राजा मंत्रीमंडळाला सल्ला देण्याचे कार्य करतो. मंत्रीमंडळावर राजाचा सल्ला बंधनकारक नसतो. त्यामुळेच त्याचे पालन केलेच पाहिजे असे बंधन नाहि.

२) प्रोत्साहन देणे : राजा आपल्या अनुभवाच्या आधारावर काहि निर्णय घेण्याबाबत मंत्रीमंडळाला प्रोत्साहन करतो. अनेकदा मंत्रीमंडळ निर्णय घेण्याबाबत साशंक असते अशा वेळेस राजा प्रोत्साहित करतो, सुचना करतो.

३) मंत्रीमंडळाला समज देणे : याअंतर्गत राजा मंत्रीमंडळाच्या एखाद्या निर्णयाचे देशाच्या व्यवस्थेवर दुरगामी गंभीर परिणाम पडणार सअतील तर समज, ताकीद देण्याचे कार्य राजा करतो.

यादृष्टीने राजा आपल्या व्यक्तिगत अधिकारांच्या आधारावर राज्यकारभारामध्ये आपली छाप उमटवित असतो.

**राजाचे स्थान किंवा भूमिका :-**

इंग्लंडमध्ये राजाच्या अधिकार व सत्तांचा अभ्यास केल्यानंतर राजा सर्वोच्च सत्ताधीश आढळतो कारण कार्यकारी, कायदेकारी, परराष्ट्रीय, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात त्याला अधिकार मिळालेले असून त्यामुळे संपूर्ण देशांतर्गत तसेच देशाबाहेर त्याची सत्ता प्रस्थापित झालेली आहे.

परंतू इंग्लंडमध्ये राजा सुरवातीला सर्व सत्ताधिश होता तोच सत्तांचा वापर करीत असे परंतू १६८८ च्या क्रांतीनंतर ब्रिटनने सांसदिय शासनपध्दतीचा स्वीकार केला. राजाच्या सत्ता कायदेमंडळाकडे हस्तांतरीत झाल्या आणि कायदेमंडळाच्या पाठींब्यावर निर्माण झालेले मंत्रिमंडळ त्याचा प्रत्यक्षात वापर करायला लागेल. त्यामुळे राजाचे स्थान नामधारी सत्ताधिशाचे बनलेले आहे.

असे असले तरी राजावरची श्रध्दा, विश्वास तसेच त्याचे महत्व ब्रिटीश जनतेने कमी होवू दिलेले नाही.

**इंग्लंडचे मंत्रिमंडळ व प्रधानमंत्री :-**

इंग्लंडमध्ये मंत्रिमंडळाची निर्मिती सुध्दा रुढी प्रथांच्या आधारावरच झालेली असून आज मंत्रिमंडळ सर्वोच्च शक्तीशाली बनलेली आढळते कारण राजाच्या सर्व अधिकार व सत्तांचा वापर प्रत्यक्षपने मंत्रीमंडळ करते येथे इतर संस्थाप्रमाणेच मंत्रीमंडळ सहरचनेची निर्मिती सुध्दा काळाच्या ओघामध्ये झालेली आहे मंत्रिमंडळाची

**निर्मितीचा इतिहास :-**

येथे इतर संस्थाप्रमाणेच मंत्रिमंडळाची निर्मिती आवश्यकतेनुसार होवून विकास होत गेलेला आहे.पूर्वी निरंकुश राजेशाहीच्या काळात मंत्रीमंडळ वेगवेगळ्यास्वरुपात अस्तित्वात होते सूरवातीला सल्लामसलत करणारी ग्रेट कौन्सिल अस्तित्वात होती.नॉर्मन राजांच्या काळात क्युरीया रेजीस मध्ये परिवर्तन होवून राजाकडे लक्ष देणे हे प्रमुख कार्य होते.

ट्युटर आणि स्टुअर्ट राजांच्या काळात प्रिव्ही कौन्सील अस्तित्वात आली.ज्यावेळेस राजे स्वमताने निर्णय घेत तेव्हा प्रिव्ही कौन्सिल नाममात्र राहत असे तर हेन्री सहावा व रिचर्ड दुसज्या काळात ती शक्तीशाली बनली यामध्ये राजघराण्यातील व्यक्ती याच्या सभासद राहत.

मंत्रि-मंडळाचा खरा विकास चार्लस दुसज्याच्या काळात व्हायला लागला. प्रिव्ही कौन्सिलचा वाढत्या संख्येमुळे त्याने पाच जणांचा सल्ला घ्यावयास सरवात केली तिथेच (कॅबिनेट) अस्तित्वात आले व कॅबिनेटचे स्थान महत्वपुर्ण बनले परंतू कॅबिनेटचे वाढते. वर्चस्व पार्लमेंटला मान्य नव्हते.मंत्रिमंडळ पार्लमेंटला जबाबदार असेल पाहिजे पुढे १६८८ मध्ये क्रांति होवून राजा नाममात्र बनला व मंत्रिमंडळ राजाच्या सत्ताचा वापर करायला लागले.जॉर्ज पहिला यांच्या काळात तर त्याने मंत्रिमंडळाच्या बैठकींना जाणे बंदकेले व जेष्ठ मंत्री रॉबर्ट वॉलपोलने बैठकीचे संचालन कले व तिथुनच प्रधानमंत्री पदाची निर्मिती झाली. प्रधानमंत्री मंत्रिमंडळाचा प्रमुख बनुन राजा व मंत्री मंडळ याचा संबंध संपला १९३७ च्या कायद्याने मंत्रिमंडळाला कायदेशीर स्थान प्राप्त झाले व मंत्रिमंडळ वास्तविक शासक बनले.

**मंत्रिमंडळ निर्मिती :-**

ब्रिटनमध्ये पार्लमेंटला जबाबदार मंत्रिमंडळ पध्दती विकसित झाली.त्यानुसार तेथे सार्वत्रिक निवडणुकीमध्ये (हाऊस ऑफ कॉमन्स सभागृहाच्या) ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होईल. त्या पक्षाचे मंत्रिमंडळ बनते. बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला राजा किंवा

राणीद्वारे प्रधानमंत्रीपदी बोलविल्या जाते आणि प्रधानमंत्री मंत्रिमंडळातील मंत्र्यांची यादी राजाला सादर करतो व राजा / राणी त्यांना मंत्री पदाची शपथ देते.

**मंत्रिमंडळाची सदस्य संख्या :-** ही संख्या कायद्याद्वारे निश्चित नाही प्रधानमंत्र्याला त्याबाबत सर्वाधिकार आहे. साधारणत: ५० ते ६० च्या दरम्यान ती असते. मंत्र्यांची निवड पंतप्रधानाद्वारे होते. मंत्रिमंडळात कॅबीनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री यांचा समावेश असतो.

**मंत्रिमंडळाचा कार्यकाळ :-** हाऊस ऑफ कॉमन्सचा विश्वास असे पर्यंत मंत्रिमंडळ पदावर राहते. आणि कॉमन्स सभागृहातील बहुमतातील पक्षाचेच मंत्रिमंडळ असल्याने ते साधारणपणे ५ वर्षे कार्य करते. परंतु कार्यकाल संपण्यापुर्वी सुध्दा मंत्रिमंडळाचे विसर्जन होऊ शकते.

**मंत्रिमंडळाच्या बैठका व कार्यपध्दती :-**

मंत्रिमंडळ दैनंदीन राज्यकारभार पाहणारे वास्तविक शासक असल्याने सतत कार्यरत असते मंत्रिमंडळाच्या आठवड्यातुन दोन बैठका होतात. आवश्यकता पडल्यास अतीरिक्त बैठक सुध्दा घेतल्या जाते. बैठकीचे अध्यक्षस्थान प्रधानमंत्री भुषवितो. बैठकीमध्ये बहुमताने निर्णय घेतले जातात. सामुहीक जबाबदारीनुसार निर्णय होवुन सर्वजन त्यास जबाबदार असतात.

**मंत्रिमंडळ पदमुक्ती :-**

१७४६ मध्ये पहिला प्रधानमंत्री रॉबर्ट वॉलपोलने कॉमन्स सभागृहाचा विश्वास गमावला त्यामुळे त्याने राजीनामा दिला.येथूनच मंत्रिमंडळ पार्लमेंटला (हाऊस ऑफ कॉमन्स) जबाबदार समजल्या जावू लागते.तेथुनच पार्लमेंटचा (संसदेचा) विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ पदावर सक्रिय राहाते असा संकेतनिर्माण झाला म्हणजेच पार्लमेंटने अविश्वास दाखविल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**मंत्रिमंडळाची आधारभूत तत्वे :-**

ब्रिटनचे मंत्रिमंडळ सुध्दा इतर संस्थाप्रमाणेच विकसित झाले असून त्याचा विकास होते आहे.हे मंत्रिमंडळ जे विकसित झाले ते काही तत्वांच्या आधारावरच म्हणजेच ज्या तत्वांच्या आधारावर मंत्रीमंडळ विकसित झाले त्यांना मंत्रिमंडळाची आधारभूत तत्वे असे म्हणतात.ती पुढील प्रमाणे आहेत.

१) राजा किंवा राणी मंत्रिमंडळाच्या बैठकीना हजर राहत नाही :-ब्रिटन मध्ये मंत्रीमंडळ व्यवस्थेचा विकास होत असतांना जॉर्ज प्रथम व व्दितीय भाषा व संस्कृतिचे

फारसे ज्ञान नसल्याने व विकासामुळे राजकारभाराचे कार्य मंत्रीमंडळाकडे सोपवुन टाकत.

२) मंत्रिमंडळ व हाऊस ऑफ कॉमन्स घनिष्ठ संबंध :- ब्रिटनमध्ये सुरुवातीला राजाच मंत्री नियुक्त कारायचा परंतु पुढे विकासाच्या प्रक्रियेत कॉमन्स सभागृहातुन प्रधानमंत्री व मंत्रि याची नियुक्ती व्हायाला लागली व ते मंत्रिमंडळाचे आधारभुत तत्वे बनले.

३) राजकीय एकजिनसीपणा :- मंत्रिमंडळाच्या विकासाच्या प्रक्रियेत सम्राट विलीया याने प्रशासनाच्या सोयीसाठी एकाच पक्षाचे मंत्रि घ्यावयास सुरुवात केली तेव्हा पासुन ति प्रथा निर्मान होवुन मंत्रिमंडळ सर्व निर्णयास सामुहिक रित्या जबाबदार धरल्या गेले व तिथुन राजकीय एकजिनसीपणा या तत्वाने मंत्रिमंडळ कार्य करायला लागले.

४) गुप्तता व मतैक्य :-महात्वाचे निर्णय देशहिताच्या दृष्टीने गुप्त ठेवण्यास सुरुवात होवुन ते पुढे मंत्रिमंडळाचे आधारभुत तत्वे बनले.

५) एकनेतृत्व :-राजाने मंत्रिमंडळाच्या बैठकीनां जाण्याचे सोडले व मंत्रिमंडळात जेष्ठ सदस्यांनी बैठकीचे संचालन केले त्याचे नेवृत्व सर्वानी मान्य केले या प्रक्रियेतुन पुढे पधानमंत्राचे एकटे नेवृत्व निर्मान झाले.

**मंत्रिमंडळाची कार्ये :-**

ब्रिटनमध्ये मंत्रिमंडळ हे संकेताच्या आधारावर विकसित होत गेले राजाला सल्ला देणाज्या मंडळाकडून विकसित होत जावून आज मंत्रिमंडळ वास्तविक शासन बनलेले आढळते म्हणजेच हळूहळू राजाच्या सर्वच सत्तांचा वापर मंत्रिमंडळ करायला लागले आज मंत्रिमंडळ एवढे महत्वपूर्ण बिनले की मंत्रिमंडळाने काम करणे बंद केले तर संपूर्ण ब्रिटीश यंत्रणाच कोलमडून पडेल. राजाला प्राप्त झालेल्या सर्वच सत्तांचा वापर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मंत्रिमंडळ करीत असते त्यामुळे राजाच्या अधिकार व सत्ताच मंत्रिमंडळाची अधिकार व कार्ये ठरतात

**कार्यकारी प्रशासकिय शासनविषयक कार्ये :-**

राजाच्या कार्यकारी अधिकाराचा वापर मंत्रिमंडळच करीत असते याअंतर्गत राज्यकारभाराचे धोरण ठरविणे, धोरणाची अंमलबजावणी करणे देशांतर्गत महत्वपूर्ण नियुक्त्या करणे शासन किंवा प्रशासन चालविणे इ.

**विधिविषयक कार्ये :-**

कायदेविषयक किंवा विधीविषयक कार्ये कायदेमंडळाचे असले तरी व्यवहारामध्ये मंत्रिमंडळ या अधिकारा अंतर्गत विभिन्न कार्ये पार पाडते यामध्ये सभागृहात विधेयक मांडणे विधेयकावर चर्चा व वादविवाद करणे, मतदानात भाग घेणे आपल्या विभागासंबंधी नियम तयार करणे, अध्यादेश काढणे, पार्लमेंटचे अधिवेशन बोलविणे, अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका तयार करणे अधिवेशन स्थगीत करणे, राजाचे अभिभाषण तयार करणे इ.

**आर्थिक कार्ये :-**

वास्तविक शासक म्हणुन आर्थिक अधिकाराअंतर्गत सुध्दा मंत्रिमंडळाला विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात त्यानुसार इंग्लंडच्या सर्व आर्थिक व्यवहाराची जबाबदारी मंत्रिमंडळावरच आहे.पार्लमेंटमध्ये अर्थविधेयक मांडणे त्याची अम्मलबजावणी करणे अर्थविधेयकामध्ये कर लावणे, रद्द करणे. आर्थिकयोजना तयार करणे इ. अर्थविधेयक महत्वपूर्ण असते.कारण कॉमन्स सभागृहाने अर्थविधेयक नामंजुर केल्यास केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

अश्याप्रकारे इंग्लंडमध्ये राज्यकारभाराचा प्रत्येक निर्णय मंत्रिमंडळच घेत असते. कायदेमंडळ औपचारीक मान्यता देते कारण पार्लमेंट मधे मंत्री मंडळाच्या पक्षाचे बहुमत असल्याने मंत्रिमंडळच एकप्रकारे सार्वभौम बनलेले आढळते

**परराष्ट्र विषयक कार्ये :**

देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणुन ब्रिटनचा राजाला परराष्ट्राच्या संदर्भात जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर मंत्रिमंडळच क र णो . यांअतर्गत देशाचे परराष्ट्रीय धोरण ठरविणे, त्याची अंमलबजावणी करणे, परराष्ट्रशी तह व करार करणे, युध्द घोषीत करणे, स्थगित करणे, परराष्ट्रात प्रतिनिधी पाठविणे, परराष्ट्रीय प्रतिनिधींचा स्विकार करणे इ. विभिन्न कार्ये वाट पाडली जातात.

**न्यायविषयक कार्ये :-**

या अंतर्गत सुध्दा राजाच्या न्याय विषयक सत्तांचा वापर मंत्रिमंडळच करतांना आढळते. यामध्ये न्यायधिशांच्या नियुक्त राजा प्रधानमंत्राच्या सल्याने च करतो. तसेच ब्रिटीश राजाला जो क्षमादानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्याबाबत निर्णय खद्रायर्याने मंत्रिमंडळच घेते.

**मंत्रिमंडळाची भुमिका :-**

मंत्रिमंडळाची रचना अधिकार व कार्ये पाहिल्यानंतर इंग्लंडच्या शासनव्यवस्थेत मंत्रिमंडळाची नेमकी भुमिका काय ते पहाणे आवश्यक ढरते. इंग्लडंच्या शासन व्यवस्थेत मंत्रिमंडळाचे स्थान पहतांना मंत्रिमंडळ सर्वोच्या शक्तिशाली संस्था बनली आहे असे म्हणतात येते कारण येथे राज्यघटना अलिखित आहे. अशा मंत्रीमंडळ सर्वोच्च पार्लमेंटची पाटीब्यांवर मंत्रीमंडळाचे आधारीत असते . मात्र मंत्रिमंडळात आपल्या च पत्राचे जेष्ठ नेते काम करित असल्याने सहसा पार्लमेंटच्या हाऊस ऑफ कॉमर्स हे सभागृह आपल्याच पक्षाच्या नेत्यांवर अविश्वास ठराव आणित नाही आणि त्यामुळे मंत्रिमंडळ बहुमताच्या जोरावर आपलयाला हवे तसे कायदे मंजूर करुन घेतात येतात. त्याबरोबर इंग्लंडमध्ये मंत्रिमंडळाला विभित्त अधिकारी क्षेत्राअंतर्गत जे अधिकार प्राप्त झ ालेत त्यामुळे कार्यकारी, कायदेकारी, न्यायविषक परराष्ट्रीय अशा विभिन्न अधिकारांवरचा आधारे मंत्रिमंडळाचे सर्वत्र संस्था विभागांवर नयंत्रण कुढल्याही देशाचा राज्यकारभार चालण्यासाठीसंवैधानिक सरंचनांची निर्मिती झालेली असते. राज्यकारभार व प्रशासनासाठी प्रामुख्याने कादा, त्याची अंमलबणावती व न्यायदान या बाबी आवश्यक असून पुर्वी राजेशाहीत ही सर्व कार्ये राजा जवळ केंद्रीत झालेली होती व त्यातुनच राजा पुढे अनियंत्रीत वागण्यातूनच इंग्लंडमध्ये राजा विरुध्द पार्लमेंट प्रजा संघर्ष झाला आणि संघर्षामध्ये ब्रिटीश जनतेचा विजय होवून राजा ज्या अधिकारांमुळे अनियंत्रित बनला ते अधिकार वास्तविकरितया त्या सला वापरण्याचा अधिकार काढून राजाला नाममात्र बनविण्यात येवून हळूहळू तयाच्या कायदेकारी, कार्यकारी, न्यायकारी सत्तांच्या प्रत्यक्षात वापरण्याच्या दृष्टीने ब्रिटनमध्ये रुढी प्रथा परंपरा व काही लिखित कायदयांच्या आधारे कायदेमंडळ (पार्लमेंट) मंत्रिमंडळ व न्यायमंडळ या संरचना अस्तित्वात आल्यात या संरचनानीच ब्रिटनच्या राज्य व्यवस्थेला, अलिखीत घटनेला एक संवैधानिक चौकट निर्माण झाल्याने या संरचनांना संवैधानिक संरचना असे संबोधल्या जाते. या संरचनांचा आढावा पुढिलप्रमाणे आढळतो.

**ब्रिटनचा प्रधानमंत्री**

ब्रिटनमध्ये सांसदिय लोकशाहीचा विकास होत जावून राजाच्या अधिकार व सत्तेचा प्रत्यक्षपणे वापर करण्याकरिता मंत्रिमंडळ संस्थेनचा विकास झाला आणि हे मंत्रिमंडळ शक्तिशाली बनलेले आढळते अश्या या शक्तिशाली मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणुन प्रतप्रधानाचे पद विकसित झाले. अणि शक्तिशाली बनले, ब्रिटीश व्यवस्थेतील या

शक्तिशाली पदाची तुलना अमेरिकन राष्ट्रध्यक्षाशी केल्या जाते. कारण ब्रिटिश व्यवस्थेमध्ये राजकारणाचा केंद्रबिंदु प्रधानमंत्राचे पद असते. या पदाची निर्मिती सुध्दा काळाच्या ओघामध्ये रुढी, परंपरेच्या आधारावर झाली. अशा या पदाचा आढावा घ्यावा लागतो.

प्रधानमंत्राची नियुक्ती : प्रथेनुसार प्रधानमंत्राची नियुक्ती राजा करतो. देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणुन सर्वच महत्वपुर्ण पदावरील नियुक्त्या राळा करीत असतो. परंतु राजाचा हा अधिकार औपचारिक ठरतो कारण हाऊस ऑफ कॉमन्स या पार्लमेंटच्या सभागृहात ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होईल त्या पक्षाच्या नेत्यालाच प्रधानमंत्रि म्हणुन नियुक्त करावे लागते.

परंतु जर कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त झाले नाही तर या विशिष्ट परिस्थितीत राजा त्याच्या विवेकानुसार कोण कॉमन्स सभागृहात बहुमत जमवू शकेल हे विचारात घेवून प्रधानमंत्र्याची नियुक्ती करु शकतो. परंतु अशा व्यक्तिने दिलेल्या मुदतीच्या आत बहुमत सिध्द केले पाहिजे.

**प्रधानमंत्र्याचा कार्यकाल :-**

प्रधानमंत्री मंत्रिमंडळाचा प्रमुख असल्याने मंत्रीमंडहाबाबत त्याचा कार्यकाळ असतो. किंबहुना प्रधानमंत्र्यावर मंत्रिमंडळाचा कार्यकाल अवलंबून असतो. किंबहुना प्रधानमंत्र्यावर राजीनामा म्हणजे संपुर्ण मंत्रिमंडळावर राजीनामा असतो. येथे कॉमन्स सभागृहाचा विश्वास असेपर्यंत प्रधानमंत्री पदावर राहतो.

**प्रधानमंत्र्याची पदमुक्ती :**

प्रधानमंत्रयाला कॉमन्स सभागृह पदमुक्त करु शकते. कॉमन्स सभागृहत अविश्वास ठराव मंजुर झाल्यास प्रधानमंत्रयाला राजीनामा घ्यावा लागतो.

तसेच प्रधानमंत्री ज्या पदाचा असतो संबंधीत पक्षाने सांगितल्यास प्रंतप्रधानाला राजीनामा दयावा लागतो. याबरोबरच पंतप्रधान स्वमताने राजीनामा देवून पदमुक्त होवु शकतो.

अशातऱ्हेने प्रधानमंत्री पदाची व्यवस्था आढळते.

**पंतप्रधानाची अधिकार व कार्ये :**

ब्रिटनमध्ये प्रधानमंत्री पद हे महत्वपुर्ण बनले असुन वास्तविक शासन प्रमुख म्हणुन प्रधानमंत्र्याला विभिन्न क्षेत्राअंतर्गत कार्ये पार पाडावी लागतात ती पुढीलप्रमाणे आढळतात.

अ) शासनाचा प्रमुख म्हणुन करावयाची कार्ये :-

प्रधानमंत्री मंत्रीमंडळ या वास्तविक शासनाचा प्रमुख आहे. आणि त्यादृष्टीने

१) शासनाचे धोरण ठरवीणे.

२) धोरणाची अंमलबजावणी करणे.

३) शासन व प्रशासनावर देखरेख ठेवणे.

४) देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था ठेवणे.

५) शासन व प्रशासनाअंतर्गत नियुक्ता करणे.

अशी विभिन्न कार्ये तो पार पाडतो याबाबतीत मंत्रीमंडळाअंतर्गत सामुहिक निर्णय घेतल्या जात असता तरी प्रमुख या नात्याने या निर्णयावर त्याचाच प्रभाव असतो.

**ब) मंत्रीमंडळाचा प्रमुख म्हणुन करावयाची कार्ये :-** प्रधनमंत्री वास्तविक शासन असलेल्या मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो नेता असतो आणि या भुमिकेतुन मंत्रिमंडळाशी संबंधित पुढील विविध कार्ये त्याला पार पाडावी लागतात.

१) मंत्रिमंडळामध्ये मंत्र्याच्या नियुक्ता करणे.

२) मंत्र्यांमध्ये विभागाचे वाटप करणे.

३) मंत्र्यांच्या विभगामध्ये बदल करणे.

४) कुणाला कोणता मंत्रि बनविणे हे ठरविणे.

५) मंत्रिमंडळाची बैठक बोलविणे, बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविणे.

६) मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय जाहिर करणे.

७) मंत्रिमंडळाचे निर्णय राजा / राणी पर्यंत पोहचविणे व राजा / राणीचे संदेश मंत्रिमंडळापर्यंत पोहचविणे.

८) मंत्र्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे

९) मंत्र्यांमध्ये समन्वय घडविणे, त्यातील मतभेद मिटविणे.

१०) मंत्र्यांकडुन त्यांच्या विभागाचा अहवाल मागविणे.

११) मंत्र्यास किंवा संपुर्ण मंत्रिमंडळा पदमुक्त करणे.

अशाप्रकारे मंत्रिमंडळाशी संबंधित प्रधानमंत्र्याला विभिन्न कार्ये मंत्रिमंडळाचा नेता म्हणुन पार पाडावी. मंत्रिमंडळाशी संबंधित अधिकार व कार्ये लक्षात घेतली असता प्रधानमंत्री सर्वेस्वी असलेला आढळतो. मंत्रिमंडळाच्या निर्मितीपासुन तर पदमुक्ति पर्यंतचे सर्वधिकार पंतप्रधानाला आहेत आणि त्यामुळे मंत्रिमंडळाचे संपुर्ण अस्तित्वच प्रधानमंत्र्यावर अवलंबून असते त्याला विरोध करणारा मंत्री मंत्रिमंडळामध्ये टिकुन राहु शकत नाही अि ाण म्हणुनच अनेक विचारवंत प्रधानमंत्र्याला "मंत्रिमंडळरुपी कमानीची आधारशिला"

असे संबोधतात तर काहीजण प्रधानमंत्र्याचे मंत्रिमंडळातील स्थान ग्रहमालेतील सुर्याप्रमाणे आहे असे म्हणतात.

**क) जनतेचा नेता म्हणुन करावयाची कार्ये :**

प्रधानमंत्री हाऊस ऑफ कॉमन्स या जनतेच्या सभागृहातील बहुमतातील पक्षाचा नेता असल्याने तो संपुर्ण सभागृहाचा नेता संबोधल्या जातो. त्यामुळेच तो जनतेचा नेता बनतो. त्यादृष्टीने त्याला विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात.

१) जनतेच्या समस्या सोडविणे.

२) संकटकाळात जनतेला धिर देणे, मदत पुरविणे.

३) पार्लमेंटमध्ये सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे.

इ. कार्ये जनतेचा नेता म्हणुन पार पाडावी लागतात

**ड) पक्षनेता म्हणुन करावयाची कार्ये :-**

प्रधानमंत्री एका राजकीय पक्षाचा नेता असतो. त्यामुळे त्याला आपल्या पक्षाच्या संदर्भात सध्दा काही कार्ये पार पाडावी लागतात.

१) पक्षाचे ध्येयधारण ठरविणे व अंमलबजावणी करणे.

२) पक्षाचा जाहिरनामा तयार करणे.

३) पक्षाच्या संसदेतील व बाहेरिल पक्ष सदस्यांना मार्गदर्शन करणे.

४) पक्षविरोधी कारवाया करणाप्रांतवर कारवाई करणे.

५) पक्षामध्ये नविन सभासदांना प्रवेश देते.

इ. कार्ये पक्षनेता म्हणुन प्रधानमंत्री पार पाडतो. भुमिकेतुन वेगवेगळी कार्ये पार पाडावी लागतात. या अंतर्गत, शासन प्रमुख, मंत्रीमंडळ प्रमुख, जनतेचा नेता पक्षाचा नेता अशी विविध कार्ये करतांना प्रंतप्रधानाला फार विस्तृत प्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. परंतु असे असले तरी प्रधानमंत्री या अधिकार व सत्ताचा त्याला ब्रिटिश व्यवस्थेमध्ये महत्वच राहिलेले नाही. काही अधिकारच नाही असे नाही राजाचे असलेले सर्वश्रेष्ठ स्थान, त्याच्याप्रती असलेला ब्रिटीश जनतेतील आदर या आधारावर तो व्यक्तिगत स्वरुपात काही कार्य करु शकतो त्यातुनच राजाचे व्यक्तीगत पुढील अधिकार तो वापरतो.

**कार्यकारी प्रशासकिय शासनविषयक कार्ये :-**

राजाच्या कार्यकारी अधिकाराचा वापर मंत्रिमंडळच करीत असते याअंतर्गत राज्यकारभाराचे धोरण ठरविणे, धोरणाची अंमलबजावणी करणे देशांतर्गत महत्वपूर्ण नियुक्त्या करणे शासन किंवा प्रशासन चालविणे इ.

**वधिविषयक कार्ये :-**

कायदेविषयक किंवा विधीविषयक कार्ये कायदेमंडळाचे असले तरी व्यवहारामध्ये मंत्रिमंडळ या अधिकारा अंतर्गत विभिन्न कार्ये पार पाडते यामध्ये सभागृहात विधेयक मांडणे विधेयकावर चर्चा व वादविवाद करणे, मतदानात भाग घेणे आपल्या विभागासंबंधी नियम तयार करणे, अध्यादेश काढणे, पार्लमेंटचे अधिवेशन बोलविणे, अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका तयार करणे अधिवेशन स्थगीत करणे, राजाचे अभिभाषण तयार करणे इ.

**आर्थिक कार्ये :-**

वास्तविक शासक म्हणुन आर्थिक अधिकाराअंतर्गत सुध्दा मंत्रिमंडळाला विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात त्यानुसार इंग्लंडच्या सर्व आर्थिक व्यवहाराची जबाबदारी मंत्रिमंडळावरच आहे.पार्लमेंटमध्ये अर्थविधेयक मांडणे त्याची अम्मलबजावणी करणे अर्थविधेयकामध्ये कर लावणे, रद्द करणे. आर्थिकयोजना तयार करणे इ. अर्थविधेयक महत्वपूर्ण असते.कारण कॉमन्स सभागृहाने अर्थविधेयक नामंजुर केल्यास केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

अश्याप्रकारे इंग्लंडमध्ये राज्यकारभाराचा प्रत्येक निर्णय मंत्रिमंडळच घेत असते. कायदेमंडळ औपचारीक मान्यता देते कारण पार्लमेंट मधे मंत्री मंडळाच्या पक्षाचे बहुमत असल्याने मंत्रिमंडळच एकप्रकारे सार्वभौम बनलेले आढळते

**परराष्ट्र विषयक कार्ये :**

देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणुन ब्रिटनचा राजाला परराष्ट्राच्या संदर्भात जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर मंत्रिमंडळच क र ण ा े. यांअतर्गत देशाचे परराष्ट्रीय धोरण ठरविणे, त्याची अंमलबजावणी करणे, परराष्ट्रशी तह व करार करणे, युध्द घोषीत करणे, स्थगित करणे, परराष्ट्रात प्रतिनिधी पाठविणे, परराष्ट्रीय प्रतिनिधींचा स्विकार करणे इ. विभिन्न कार्ये वाट पाडली जातात.

**न्यायविषयक कार्ये :-**

या अंतर्गत सुध्दा राजाच्या न्याय विषयक सत्तांचा वापर मंत्रिमंडळच करतांना आढळते. यामध्ये न्यायधिशांच्या नियुक्त राजा प्रधानमंत्राच्या सल्याने च क र त ा े. तसेच ब्रिटीश राजाला जो क्षमादानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्याबाबत निर्णय खद्रायर्याने मंत्रिमंडळच घेते.

**मंत्रिमंडळाची भुमिका :-**

मंत्रिमंडळाची रचना अधिकार व कार्ये पाहिल्यानंतर इंग्लंडच्या शासनव्यवस्थेत मंत्रिमंडळाची नेमकी भुमिका काय ते पहाणे आवश्यक ठरते. इंग्लडंच्या शासन व्यवस्थेत मंत्रिमंडळाचे स्थान पहतांना मंत्रिमंडळ सर्वोच्या शक्तिशाली संस्था बनली आहे असे म्हणतात येते कारण येथे राज्यघटना अलिखित आहे. अशा मंत्रीमंडळ सर्वोच्च पार्लमेंटची पाटीब्यांवर मंत्रीमंडळाचे आधारीत असते . मात्र मंत्रिमंडळात आपल्या च पत्राचे जेष्ठ नेते काम करित असल्याने सहसा पार्लमेंटच्या हाऊस ऑफ कॉमर्स हे सभागृह आपल्याच पक्षाच्या नेत्यांवर अविश्वास ठराव आणित नाही आणि त्यामुळे मंत्रिमंडळ बहुमताच्या जोरावर आपलयाला हवे तसे कायदे मंजूर करुन घेतात येतात. त्याबरोबर इंग्लंडमध्ये मंत्रिमंडळाला विभित्त अधिकारी क्षेत्राअंतर्गत जे अधिकार प्राप्त झालेत त्यामुळे कार्यकारी, कायदेकारी, न्यायविषक परराष्ट्रीय अशा विभिन्न अधिकारांवरचा आधारे मंत्रिमंडळाचे सर्वत्र संस्था विभागांवर नियंत्रण कुठल्याही देशाचा राज्यकारभार चालण्यासाठीसंवैधानिक सरंचनांची निर्मिती झालेली असते. राज्यकारभार व प्रशासनासाठी प्रामुख्याने कादा, त्याची अंमलबणावती व न्यायदान या बाबी आवश्यक असून पुर्वी राजेशाहीत ही सर्व कार्ये राजा जवळ केंद्रीत झालेली होती व त्यातुनच राजा पुढे अनियंत्रीत वागण्यातूनच इंग्लंडमध्ये राजा विरुध्द पार्लमेंट प्रजा संघर्ष झाला आणि संघर्षामध्ये ब्रिटीश जनतेचा विजय होवून राजा ज्या अधिकारांमुळे अनियंत्रित बनला ते अधिकार वास्तविकरितया त्या सला वापरण्याचा अधिकार काढून राजाला नाममात्र बनविण्यात येवून हळूहळू तयाच्या कायदेकारी, कार्यकारी, न्यायकारी सत्तांच्या प्रत्यक्षात वापरण्याच्या दृष्टीने ब्रिटनमध्ये रुढी प्रथा परंपरा व काही लिखित कायदयांच्या आधारे कायदेमंडळ (पार्लमेंट) मंत्रिमंडळ व न्यायमंडळ या संरचना अस्तित्वात आल्यात या संरचनानीच ब्रिटनच्या राज्य व्यवस्थेला, अलिखीत घटनेला एक संवैधानिक चौकट निर्माण झाल्याने या संरचनांना संवैधानिक संरचना असे संबोधल्या जाते. या संरचनांचा आढावा पुढिलप्रमाणे आढळतो.

**ब्रिटनचा प्रधानमंत्री**

ब्रिटनमध्ये सांसदिय लोकशाहीचा विकास होत जावून राजाच्या अधिकार व सत्तेचा प्रत्यक्षपणे वापर करण्याकरिता मंत्रिमंडळ संस्थेनचा विकास झाला आणि हे मंत्रिमंडळ शक्तिशाली बनलेले आढळते अश्या या शक्तिशाली मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणुन प्रतप्रधानाचे पद विकसित झाले. अणि शक्तिशाली बनले, ब्रिटीश व्यवस्थेतील या

शक्तिशाली पदाची तुलना अमेरिकन राष्ट्र्ध्यक्षाशी केल्या जाते. कारण ब्रिटिश व्यवस्थेमध्ये राजकारणाचा केंद्रबिंदु प्रधानमंत्राचे पद असते. या पदाची निर्मिती सुध्दा काळाच्या ओघामध्ये रुढी, परंपरेच्या आधारावर झाली. अशा या पदाचा आढावा घ्यावा लागतो.
प्रधानमंत्राची नियुक्ती : प्रथेनुसार प्रधानमंत्राची नियुक्ती राजा करतो. देशाचा सर्वोच्च प्रमुख म्हणुन सर्वच महत्वपुर्ण पदावरील नियुक्त्या राळा करीत असतो. परंतु राजाचा हा अधिकार औपचारिक ठरतो कारण हाऊस ऑफ कॉमन्स या पार्लमेंटच्या सभागृहात ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होईल त्या पक्षाच्या नेत्यालाच प्रंधानमंत्रि म्हणुन नियुक्त करावे लागते.

परंतु जर कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त झाले नाही तर या विशिष्ट परिस्थितीत राजा त्याच्या विवेकानुसार कोण कॉमन्स सभागृहात बहुमत जमवू शकेल हे विचारात घेवून प्रधानमंत्र्याची नियुक्ती करु शकतो. परंतु अशा व्यक्तिने दिलेल्या मुदतीच्या आत बहुमत सिध्द केले पाहिजे.

**प्रधानमंत्र्याचा कार्यकाल :-** प्रधानमंत्री मंत्रिमंडळाचा प्रमुख असल्याने मंत्रीमंडहाबाबत त्याचा कार्यकाळ असतो. किंबहुना प्रधानमंत्र्यावर मंत्रिमंडळाचा कार्यकाल अवलंबून असतो. किंबहुना प्रधानमंत्र्यावर राजीनामा म्हणजे संपुर्ण मंत्रिमंडळावर राजीनामा असतो. येथे कॉमन्स सभागृहाचा विश्वास असेपर्यंत प्रधानमंत्री पदावर राहतो.

**प्रधानमंत्र्याची पदमुक्ती :** प्रधानमंत्रयाला कॉमन्स सभागृह पदमुक्त करु शकते. कॉमन्स सभागृहत अविश्वास ठराव मंजुर झाल्यास प्रधानमंत्रयाला राजीनामा घ्यावा लागतो.

तसेच प्रधानमंत्री ज्या पदाचा असतो संबंधीत पक्षाने सांगितल्यास प्रंतप्रधानाला राजीनामा दयावा लागतो. याबरोबरच पंतप्रधान स्वमताने राजीनामा देवून पदमुक्त होवु शकतो.

अशातऱ्हेने प्रधानमंत्री पदाची व्यवस्था आढळते.

**पंतप्रधानाची अधिकार व कार्ये :**

ब्रिटनमध्ये प्रधानमंत्री पद हे महत्वपुर्ण बनले असुन वास्तविक शासन प्रमुख म्हणुन प्रधानमंत्र्याला विभिन्न क्षेत्राअंतर्गत कार्ये पार पाडावी लागतात ती पुढीलप्रमाणे आढळतात.

**अ) शासनाचा प्रमुख म्हणुन करावयाची कार्ये :-**

प्रधानमंत्री मंत्रीमंडळ या वास्तविक शासनाचा प्रमुख आहे. आणि त्यादृष्टीने

१) शासनाचे धोरण ठरवीणे.

२) धोरणाची अंमलबजावणी करणे.

३) शासन व प्रशासनावर देखरेख ठेवणे.

४) देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था ठेवणे.

५) शासन व प्रशासनाअंतर्गत नियुक्ता करणे.

अशी विभिन्न कार्ये तो पार पाडतो याबाबतीत मंत्रीमंडळाअंतर्गत सामुहिक निर्णय घेतल्या जात असता तरी प्रमुख या नात्याने या निर्णयावर त्याचाच प्रभाव असतो.

**ब) मंत्रीमंडळाचा प्रमुख म्हणुन करावयाची कार्ये :-** प्रधनमंत्री वास्तविक शासन असलेल्या मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो नेता असतो आणि या भुमिकेतुन मंत्रिमंडळाशी संबंधित पुढील विविध कार्ये त्याला पार पाडावी लागतात.

१) मंत्रिमंडळामध्ये मंत्र्याच्या नियुक्ता करणे.

२) मंत्र्यांमध्ये विभागाचे वाटप करणे.

३) मंत्र्यांच्या विभगामध्ये बदल करणे.

४) कुणाला कोणता मंत्रि बनविणे हे ठरविणे.

५) मंत्रिमंडळाची बैठक बोलविणे, बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविणे.

६) मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय जाहिर करणे.

७) मंत्रिमंडळाचे निर्णय राजा / राणी पर्यंत पोहचविणे व राजा / राणीचे संदेश मंत्रिमंडळापर्यंत पोहचविणे.

८) मंत्र्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे

९) मंत्र्यांमध्ये समन्वय घडविणे, त्यातील मतभेद मिटविणे.

१०) मंत्र्यांकडुन त्यांच्या विभागाचा अहवाल मागविणे.

११) मंत्र्यास किंवा संपुर्ण मंत्रिमंडळा पदमुक्त करणे.

अशाप्रकारे मंत्रिमंडळाशी संबंधित प्रधानमंत्र्याला विभिन्न कार्ये मंत्रिमंडळाचा नेता म्हणुन पार पाडावी. मंत्रिमंडळाशी संबंधित अधिकार व कार्ये लक्षात घेतली असता प्रधानमंत्री सर्वेस्वी असलेला आढळतो. मंत्रिमंडळाच्या निर्मितीपासुन तर पदमुक्ति पर्यंतचे सर्वधिकार पंतप्रधानाला आहेत आणि त्यामुळे मंत्रिमंडळाचे संपुर्ण अस्तित्वच प्रधानमंत्र्यावर अवलंबून असते त्याला विरोध करणारा मंत्री मंत्रिमंडळामध्ये टिकुन राहु शकत नाही अा ण म्हणुनच अनेक विचारवंत प्रधानमंत्र्याला "मंत्रिमंडळरुपी कमानीची आधारशिला" असे संबोधतात तर काहीजण प्रधानमंत्र्याचे मंत्रिमंडळातील स्थान ग्रहमालेतील सुर्याप्रमाणे आहे असे म्हणतात.

**क) जनतेचा नेता म्हणुन करावयाची कार्ये :**

प्रधानमंत्री हाऊस ऑफ कॉमन्स या जनतेच्या सभागृहातील बहुमतातील पक्षाचा नेता असल्याने तो संपुर्ण सभागृहाचा नेता संबोधल्या जातो. त्यामुळेच तो जनतेचा नेता बनतो. त्यादृष्टीने त्याला विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात.

१) जनतेच्या समस्या सोडविणे.

२) संकटकाळात जनतेला धिर देणे, मदत पुरविणे.

३) पार्लमेंटमध्ये सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे.

इ. कार्ये जनतेचा नेता म्हणुन पार पाडावी लागतात

**ड) पक्षनेता म्हणुन करावयाची कार्ये :-**

प्रधानमंत्री एका राजकीय पक्षाचा नेता असतो. त्यामुळे त्याला आपल्या पक्षाच्या संदर्भात सध्दा काही कार्ये पार पाडावी लागतात.

१) पक्षाचे ध्येयधारण ठरविणे व अंमलबजावणी करणे.

२) पक्षाचा जाहिरनामा तयार करणे.

३) पक्षाच्या संसदेतील व बाहेरिल पक्ष सदस्यांना मार्गदर्शन करणे.

४) पक्षविरोधी कारवाया करणाप्रांतवर कारवाई करणे.

५) पक्षामध्ये नविन सभासदांना प्रवेश देते.

इ. कार्ये पक्षनेता म्हणुन प्रधानमंत्री पार पाडतो. भुमिकेतुन वेगवेगळी कार्ये पार पाडावी लागतात. या अंतर्गत, शासन प्रमुख, मंत्रीमंडळ प्रमुख, जनतेचा नेता पक्षाचा नेता अशी विविध कार्ये करतांना प्रंतप्रधानाला फार विस्तृत प्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. परंतु असे असले तरी प्रधानमंत्री या अधिकार व सत्ताचा त्याला ब्रिटिश व्यवस्थेमध्ये महत्वच राहिलेले नाही. काही अधिकारच नाही असे नाही राजाचे असलेले सर्वश्रेष्ठ स्थान, त्याच्याप्रती असलेला ब्रिटीश जनतेतील आदर या आधारावर तो व्यक्तिगत स्वरुपात काही कार्य करु शकतो त्यातुनच राजाचे व्यक्तीगत पुढील अधिकार तो वापरतो.

कार्यकारी विभाग

(राजा / राणी, प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ)

१) ब्रिटिश राजा / राणी कोणते शासन प्रमुख आहे ?

अ) नाममात्र ब) वास्तविक

क) नाममात्र व वास्तविक ड) यापैकी नाही

२) इंग्लडमध्ये राजाच्या सत्ता नाममात्र होण्याकरिता कोणती क्रांती कारणीभुत ठरली ?

अ) १७७६ ची क्रांती ब) १६८८ ची क्रांती

क) १९२४ ची क्रांती ड) १८४८ ची क्रांती

३) ब्रिटनचा वास्तविक शासनप्रमुख कोण ?

अ) पार्लमेंट ब) मंत्रिमंडळ क) राजा/राणी ड) यापैकी नाही

४) इग्लंडमध्ये राजाची निवड कोणत्या पध्दतीने होते.

अ) निवडणुकीतुन जनतेद्वारे ब) पार्लमेंट सदस्याद्वारे

क) न्यायालयाद्वारे ड) वंशपरंपरेने

५) राजा जोपर्यंत राजवाड्यात आहे तोपर्यंत ब्रिटन सुरक्षित आहे असे कोणाबाबत म्हटल्या जाते ?

अ) पंतप्रधान ब) राजा

क) मंत्रिमंडळ ड) पार्लमेंट

६) पार्लमेंटच्या अधिवेशनात कोण अभिभाषण करतो ?

अ) राजा ब) पंतप्रधान

क) न्यायाधिश ड) अर्थमंत्री

७) ब्रिटनमध्ये तिन्ही सैन्यदलाचा सरसेनापती कोण ?

अ) पंतप्रधान ब) संरक्षणमंत्री

क) राजा / राणी ड) यापैकी नाही

८) ब्रिटनमध्ये राजा कशाचा निर्माता समजल्या जातो ?

अ) न्याय ब) रुढी

क) संकेत ड) यापैकी नाही

९) राजाच्या मंजुरीनंतर विधेयकाचे कशात रुपांतर होते ?

अ) अध्यादेशात ब) रुढी व परंपरेत

क) कायद्यात ड) यापैकी

१०) ब्रिटनमध्ये देशाचा राज्यकारभार कुणाच्या नावे चालतो ?

अ) राजा ब) प्रधानमंत्री

क) मंत्रिमंडळ ड) न्यायालय

११) मंत्रिमंडळाचा प्रमुख कोण असतो ?
अ) हाऊस ऑफ कॉमन्सचा स्पीकर ब) राजा
क) चान्सलर
ड) प्रधानमंत्री

१२) मंत्रिमंडळाचा कार्यकाळ किती असतो ?
अ) हाऊस ऑफ लॉर्डच्या विश्वास असेपर्यंत ब) चार वर्षे
क) सहा वर्ष ड) यापैकी नाही

१३) ब्रिटनमध्ये मंत्रिमंडळाची निर्मिती करण्याचा घटनात्मक अधिकार कुणाला आहे ?
अ) पंतप्रधान ब) पार्लमेंट
क) राजा ड) यापैकी नाही

१४) मंत्रिमंडळावर कोणते सभागृह अविश्वास ठराव आणुन मंत्रिमंडळाला पदमुक्त करुन शकते ?
अ) हाऊस ऑफ लॉर्डस ब) हाऊस ऑफ सिनेट
क) हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटीव्ह ड) हाऊस ऑफ कॉमन्स

१५) ब्रिटीश मंत्रिमंडळात विभागांचे वाटप कोण करतो ?
अ) राजा ब) प्रधानमंत्री क) स्पीकर
ड) यापैकी नाही

१६) ब्रिटनमध्ये कोणत्या कायद्याने मंत्रिमंडळाला कायदेशीर स्थान मिळाले.
अ) १९३७ चा कायदा ब) १२१५ चा कायदा
क) १६४८ चा कायदा ड) १९१५ चा कायदा

१७) कोणत्या सभागृहातील बहुमत प्राप्त पक्षाचे मंत्रिमंडळ बनते ?
अ) प्रतीनिधी ब) राज्यसभा
क) लॉर्डस ड) कॉमन्स

१८) मंत्र्यांना मंत्रीपदाची कोण शपथ देते ?
अ) प्रधानमंत्री ब) राजा / राणी
क) स्पीकर ड) चान्सलर

१९) मंत्रिमंडळ कुणाला जबाबदार असते ?

अ) हाऊस ऑफ लॉर्डस ब) हाऊस ऑफ कॅामन्स
क) राजा/राणी ड) यापैकी नाही

२०) ब्रिटीश मंत्रिमंडळाचे आधारभुत तत्व कोणते ?
अ) राजा / राणी मंत्रिमंडळ बैठकीना उपस्थित राहत नाही.
ब) मंत्रिमंडळ व हाऊस ऑफ कॉमन्स घनिष्ठ संबंध
क) सामुहिक जबाबदारी ड) वरील सर्व

२१) प्रधानमंत्र्याची नियुक्ती कोण करतो.
अ) हाऊस ऑफ कॉमन्स ब) चान्सलर
क) राजा/राणी ड) यापैकी नाही.

२२) राजा/राणी व मंत्रीमंडळातील दुवा म्हणुन कोण कार्य करतो ?
अ) चान्सलर ब) पंतप्रधान
क) स्पीकर ड) यापैकी नाही.

२३) मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान कोण भुषवितो ?
अ) चान्सलर ब) राजा
क) पंतप्रधान ड) यापैकी नाही

२४) मंत्रिमंडळात कुणाचे एक नेतृत्व असते.
अ) राजा ब) प्रधानमंत्री
क) चान्सलर ड) यापैकी नाही

२५) ब्रिटनमध्ये विरोधी पक्षाच्या मंत्रिमंडळाला काय म्हणतात ?
अ) छाया मंत्रीमंडळ बत्र कॅबीनेट
क) मंत्रिपरीषद ड) यापैकी नाही

२६) ब्रिटनमध्ये सन्मानदर्शक पदव्यांचे वाटप कोण करतो ?
अ) पंतप्रधान ब) स्पीकर
क) चॉन्सलर ड) राजा/राणी

२७) पार्लमेंटमधील राजाचे अभिभाषण कुणी तयार केलेले असते ?
अ) पार्लमेंट ब) मंत्रीमंडळ
क) स्वत: राजाने ड) यापैकी नाही

२८) राष्ट्रकुल संघटनेचा प्रमुख कोण आहे ?
अ) राजा/राणी ब) पंतप्रधान
क) चान्सलर ड) यापैकी नाही

२९) मंत्रिमंडळात पंतप्रधानाचे स्थान कशाप्रकारचे आहे.
अ) हुकुमशाही ब) निरंकुश
क) समानातील प्रथम ड) यापैकी नाही

३०) ब्रिटीश राजकारण कुणाच्या व्यक्तीमत्वाभोवती केंद्रीत झालेले आढळते.
अ) राजा/राणी ब) प्रधानमंत्री
क) स्पीकर ड) चान्सलर

३१) ब्रिटनमध्ये मंत्रिमंडळात आधुनिक काळात प्रचलीत झालेला मंत्र्याचा प्रकार कोणता ?
अ) कॅबीनेट मंत्री ब) राज्यमंत्री
क) उपमंत्री ड) कीचन कॅबीनेट

३२) ब्रिटनमध्ये सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेल्या व्यक्तीच्या शिक्षा रद्द करणे, लांबणीवर टाकण्याचा अधिकार कुणाला आहे ?
अ) पंतप्रधान ब) राजा/राणी
क) पार्लमेंट ड) यापैकी नाही

३३) ब्रिटनमध्ये जास्तीत जास्त मंत्री कोणत्या सभागृहातुन घेतले जातात ?
अ) लॉर्डस ब) कॉमन्स
क) प्रतिनिधी ड) यापैकी नाही

३४) ब्रिटनमध्ये राजा व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणुन कोण कार्य करतो ?
अ) चांन्सलर ब) स्पीकर
क) प्रधानमंत्री ड) यापैकी नाही

३५) ब्रिटीश राजा / राणीचा कार्यकाल किती ?
अ) ५ वर्ष ब) ६ वर्ष
क) ७ वर्ष ड) आजीवन

३६) ब्रिटन मंत्रिमंडळात प्रधानमंत्री कोणत्या सभागृहाचा नेता असतो ?
अ) कॉमन्स ब) लॉर्डस

क) लोकसभा ड) राज्यसभा

३७) ब्रिटनमध्ये मंत्र्यास किती महिन्याच्या आत पार्लमेंटचे सदस्यत्व प्राप्त करावे लागते ?

अ) सहा ब) पाच

क) चार ड) तिन

३८) राजा सार्वभौम नाममात्र आहे असे का म्हटल्या जाते ?

अ) राजा सर्व सत्तेचा स्वत: वापर करतो

ब) ब्रिटनमध्ये राजाला सर्व सत्ता प्राप्त आहेत परंतु तो स्वत: त्याचा वापर करत नाही.

क) राजा वंश परंपरेने निवडल्या जाते.

ड) यापैकी नाही

❑❑❑

**4**

# ब्रिटिश पार्लमेंट
# (कायदेमंडळ / विधीमंडळ )

**हाऊस ऑफ लॉर्डस व हाऊस ऑफ कॉमन्स**

इंग्लंडमध्ये इतर संस्थेप्रमाणेच पार्लमेंटचा हळूहळू विकास झाला.प्रथा रुढींच्या आधारावरच पार्लमेंटची निर्मिती होत जावून पार्लमेंट सर्वोच्च संस्था बनलेली आहे. १३ जुन १२१५ रोजी जॉन राजाने राजाचे अधिकार मर्यादित करण्याला मान्यता दिली १८६५ रोजी कायदेमंडळ निर्माण करुन (मॉन्टफोर्डने) त्यात धर्मगुरु, बॅरान्स याबरोबर विस नगरांचे चार प्रतिनिधीचा समावेश केला. प्रथम एडवर्डने प्रत्येक नागरीकाला प्रतिनिधीत्व दिले आणि जनतेचे प्रतिनिधीत्वमान्य केले त्यातुन मॉर्डन पार्लमेंट अस्तित्वात आले.१६४८ चार्लस राजांनी पार्लमेंटच्या संम्मतीनेच शासन कारभार केला. १६८८ मधील क्रांतीनंतर संसदेची सर्वोच्चता मान्य करण्यात आली.

ब्रिटनचे पार्लमेंट द्विगृही आहे.या पार्लमंटच्या द्विगृही रचनेचा विकास सुध्दा हळूहळू झालेला आहे.त्यानुसार सुरवातीला हे पार्लमेंट एकगृही होते. हाऊस ऑफ लॉडर्स हे एकच सभागृह होते परंतु पुढे लोकशाहीमध्ये जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह असावे ह्या विचारातुन कॉमन्स सभागृहाची निर्मिती झाली त्यामुळे हाऊस ऑफ कॉमन्स सभागृहाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**हाऊस ऑफ लॉर्डसची रचना (वरिष्ठ व द्वितीय सभागृह)**

हाऊस ऑफ लॉर्डस हे ब्रिटीश पार्लमेंटचे व्दितीय व वरिष्ठ सभागृह आहे. हे सभागृह सर्वात प्राचीन असुन त्याची निर्मीतीच मुळात राजघराण्यातील व्यक्तीना प्रतिनिधीत्व, मिळण्यासाठी झाली. पहिल्या एडवर्डच्या काळात मॅगनम कॉन्सीलियमचे मॉडर्न पार्लमेंटमध्ये रुपांतर झाले तेव्हा हे एकच सभागृह होते. यामध्ये राजघराण्यातील व्यक्ती, धर्मगुरु, सरदार, जहगिरदार यांचा समावेश होतो. ब्रिटनमध्ये विभिन्न पदव्याप्राप्त व्यक्तीना सभागृहाचे

सभासदत्व प्राप्त होते. ड्युक, अर्ल, व्हिसकौट, लॉर्ड इ.पदवीप्राप्त व्यक्तींना या सभागृहाचे सभासदत्व प्राप्त होते.

**सभासदत्व :-**

येथे विभिन्न प्रकारचे सभासद असतात या सभागृहाची सभासदसंख्या सतत बदलते.पुढील विभिन्न सभासदांचा यामध्ये समावेश होतो.

१) राजघराण्यातील पिअर्स :-

राजघराण्यातील राजपूत्रांना डयुक पदवी प्राप्त झाल्यानंतर सभागृहाचे सभासदत्व प्राप्त होते.

२) वांशिक पिअर्स : हा प्रकार महत्वपुर्ण ठरतो कारण ९०% सभासद याच प्रकारातील असतात.

पदवी प्राप्त व्यक्तीच्या मृत्युनंतर तिचे सभासदत्व तिच्या वंशजाला प्राप्त होते.

३) स्कॉटलंडचे पिअर्स :- १७०७ च्या ॲट ऑफ युनियन वींथ स्कॉटलँड या कायद्यानुसार स्कॉटलँड या भागाला १६ प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

४) आयर्लंडचे प्रतिनिधीत्व : सुरवातील आयर्लंड मधुन येथे प्रतिनिधीत्व देण्यात येत होते आता आयर्लंड स्वतंत्र झाले.

५) धार्मिक लॉर्डस : धर्मगुरुंना सुध्दा येथे प्रतिनिधीत्व देण्यात येते त्यांचे २६ प्रतिनिधी असतात.

६) लॉ-लॉर्डस : हे सभागृह ब्रिटनचे सर्वोच्च न्यायालय म्हणून कार्य करते त्यादृष्टीने न्यायदानासाठी येथे ९ लॉलॉडर्सना प्रतिनिधीत्व दिल्या जाते.

७) आजिव सभासद:-

१९५८ च्या कायद्या नुसार येथे काही आजिव सभासद असतात.विभिन्न घटकांना प्रतिनिधीत्व आढळते अशारितीने येथे सभागृहाची सभासदसंख्या १००० च्या जवळ असली तरी तेथे बैठक सुरु होण्यासाठी केवळ ३ सभासदांची उपस्थिती आवश्यक असते कारण तेथे बहुसंख्य सदस्य उपस्थित राहत नाही.

**अध्यक्ष : (लॉर्ड चॉन्सलर)**

या सभागृहाचे वैशिष्ट्ये म्हणजे येथील सभासदांना आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नाही. राजा मार्फत याची नियुक्ती होत असुन हा मंत्रीमंडळातील एक जेष्ठ मंत्री सुध्दा असतो. लॉर्ड चॅन्सलर सभागृहाचा सदस्य असला पाहिजे असे बंधन नाही. याला फारसे महत्व पुर्ण अधिकार नाही.

**अधिवेशन :-**

सभागृहाचे वर्षातुन दोन अधिवेशने होतात.अधिवेशनात विधेयकांवर विचारविनिमय होवून कायदा तयार केल्या जातो.कॉमन्स सभागृहाकडुन आलेल्या विधेयकावर विचारविनीमय होतो. विधेयक मंजुर किंवा नामंजुर केली जातात. विधेयक मंजुरीसाठी कमीतकमी तीस सभासदांची मंजुरी आवश्यक असते. हे सभागृह कॉमन्स सभागृहाच्या विधेयकामधे दुरुस्त्या सूचवु शकते. या सभागृहाची गणसंख्या केवळ तीन एवढी आहे म्हणजेच तीन सभासद उपस्थित असतील तर सभागृहाचे कामकाज सुरु होते.

अश्या त-हेने हाऊस ऑफ लॉर्डस सभागृह आढळते.

**हाउस ऑफ लॉर्डसची अधिकार व कार्य :-**

हाउस ऑफ लॉर्डस हे ब्रिटीस पार्लमेंटचे सभागृह असुन पार्लमेंटला प्रप्त विभीन्न अधिकार व कार्याचा हाउस ऑफ लॉर्डस हे सभागृह वापर करुन पुढील विभिन्न क्षेत्राअंतर्गत विभिन्न कार्य पार पाडते.

१. विधिविहायक कायदेशीर अधिकार :- या अंतर्गत पार्लमेंटचे एक सभागृह म्हणुन विधि किवा कायदा तयार करणे हा प्रमुख अधिकार असून त्या दृष्टीने सभागृहात विधीयक मांडणे, त्यावर चर्चा किवा विचार विनिमय करणे विधेकावर मतदान करणे विधेयक मंजुर किवा नामंजुर करणे अध्या देशांना मान्यता देने किवा नाकारणे जसेच हाउस ऑफ कॉमन्स सभागृहात आलेल्या विधेयकावर चर्चा करणे, मंजुर किवा नामंजुर करणे, त्यात दुरुस्ता सुचविने इ. कार्य पार पाडली जातात.

येथे सर्वसाधारण (अर्थविधेयक सोडुन) विधेयक हाउस ऑफ लार्डस मध्ये सुध्दा प्रथम माडल्या जाते. कामन्स सभागृहाकडुन आलेल्या विधेका संदर्भात या सभागृहाला एक वर्षाच्या आत निर्णय घ्यावा लागतो. तसेच या सभागृहाने पाठविलेल्या दुरूस्त्या स्विकारल्याच पाहिजे याचे कॉमन्स सभागृहावर बंधन नाही व जर कॉमन्स सभागृहाने एखादे विधेयक दोन दार मंजुर करून पाठविले तर लॉर्डस सभागृहाला त्यास मंजुरी द्यावी लागते. या दृष्टीने लार्डस सभागृह कॉमन्स च्या तुलनेत शासकिय बनले आहे.

२. कार्यकारी अधिकार (प्रशाकीय/शासनविषयक) :- या अधिकाराअंर्तगत पार्लमेंटला कार्याकारी विभागावर नियंत्रण ठेवण्याच्या सत्ता प्रप्त झालेल्या असुन लार्डस सभागृहातील सदस्य त्या अंतर्गत मुत्रांना प्रश्न उपप्रश्न विचारणे, त्याच्या कार्याची माहिती मागविने सभागृहात स्थगत प्रस्ताव लक्षवेद्यी सुचना, कामरोको प्रस्ताव मांडने या मार्गाव्दारे येथील

सदस्य कॅबिनेटवर नियंत्रण ठेवतात.

येथे महत्वपुर्ण म्हणजे मंत्रिमंडाळावर अविश्वास ठराव मांडुन त्यांना पदमुक्त करण्याचा अधिकार या सभागृहाला नाही त्या दृष्टीने हे सभागृह कॉमन्स सभागृहाच्या तुलनेत शक्तिहिन ठरते.

३. आर्थिक अधिकार :- आर्थिक क्षेत्र महत्वपुणे असुन या दृष्टीने सुध्दा ब्रिटीस पार्लमेंटला काही आर्थिक सत्ता प्राप्त झाल्या असुन त्या अंतर्गत एक सभागृह या दृष्टीने या सभागृहाचे सदस्य विभिन्न कार्ये पार पाडतात त्यानुसार अर्थविधेकावर चर्चा विचार विनीमय करणे, त्यात दुरुस्त्या सुचविने अर्थविधेयक मंजुर किवा नामंजुर करणे नवीन आर्थिक योजनांना मंजुरी देणे किवा नाकारणे इ.

येथे महत्वपुर्ण म्हणजे अर्थविधेयक कोणते हे कॉमन्स सभागृहाचा सभापतिच ठरवितो, अर्थविधेयक प्राप्ती कॉमन्स सभागृहातच मांडल्या जाते लार्डस सभागृहात अर्थविधेयकास ( ) दिवसाच्या आज मजुरी द्यावी लागते व लार्डस सभागृहाने सुचविलेल्या दुरुस्त्या स्विकारल्याच पाहिजे याचे कॉमन्स सभागृहावर बंधन नाही . या दृष्टीने हे सभागृह शक्तिहीन ठरते.

४. न्यायविषयक अधिकार :- इंग्लंडमध्ये स्वतंत्र सर्योच्च न्यायलय नाहीतर हाउस ऑफ लॉर्डस हे सभागृहच न्यायदानाचे कार्य करते त्या दृष्टीने या सभागृहाला (नउ लॉ लॉर्डस ला) ब्रिटीश व्यवस्थेतील दिवानी व फौजदारी न्यायलयाकडुन आलेल्या खटल्यावर निर्णय देण्याचे कार्य करावे लागते. हे ब्रिटन मधील अंतिम न्यायलय असल्याने त्याच्या निर्णयावर कुठेही इतर न्यायलयात अपिल करता येत नाही.

अशाप्रकारे लॉर्डस सभागृहाचे अधिकार आढळतात यामध्ये सुरुवातीला शक्तिशाली उदयानंतर टप्याटप्याने शक्तिहीन होत गेलेले आढळते. तरी सुध्दा पार्लमेंटचे सभागृह म्हणून जुनी संस्था म्हणुन या सभागृहात महत्वाचे स्थान आहे.

**हाऊस ऑफ कॉमन्स (कनिष्ठ/प्रथम सभागृह)**

ब्रिटीस पार्लमेंटचा आढावा घेतांना सुरुवातीला येथे एकगृही पार्लमेंट असुन हाउस ऑफ लॉडर्स हे एकच सभागृह अस्तीतवात होते. या मध्ये प्रमुख्यान उच्च श्रीमंत वर्गाचे प्रनिनिधी असत ज्यामध्ये राजघराण्याचे जमिणदार धर्मगुरु असत पुढे राजाने यामध्ये इंग्लड चे काउंटिमध्ये विभाजन करुन सभागृहात काहीना प्रतिनिधीत्व दिले सर्वाची एकच सभा बोलविली उच्च प्रतिनिधी मध्ये जमिनदार सावकार धर्मगुरू या प्रतिनिधीना जनतेच्या प्रतिनिधी सोबत बसने कमिपनाचे वाटावयास लागले. आणि त्यामुळे

उच्च वर्गाचे प्रतिनिधी व सावकार प्रतिनिधी वेगळे बसुन विचार विनीमय करायचे काउटिचे प्रतिनिधी वेगळे बसायचे व त्यातुनच पुढे सर्वसामान्याच्या प्रतिनिधीचे वेगळे सभागृह होवुन त्याला हाउस ऑफ कॉमन्स हे नाव दिले. जनते संपुर्ण इंग्लंडच्या जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे हे सभागृह आहे या सभागृहाची निर्मिती सुध्दा इतर संस्थाप्रमाणेच काळाच्या ओघामध्ये झालेली आहे. राजाचे अधिकार पार्लमेंटकडे हस्तांतरीत होत गेले आणि शेवटी १९११ व १९४९ च्या पार्लमेंट कायद्यामुळे हाऊस ऑफ लॉडर्सचे अधिकार मर्यादित होवून हे सभागृह सर्वश्रेष्ठ बनले. हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असुन येथे विशिष्ट लोकसंख्येला एक प्रतिनिधी या आधारावर मतदारसंघाची निर्मिती केल्या जाते त्यामुळे मतदारसंघाएवढी यासभागृहाची सभासदसंख्या असते म्हणुन मतदार संघ कमी जास्त झाले तर या सभागृहाचीसभासदसंख्या कमी जास्त होते सर्वसाधारणपणे सत्तरहजार ते एक लाख लोकसंख्येला एक प्रतिनिधी या आधारावर ६५० एवढे मतदार संघ आढळतात या सभागृहाच्या निवडणुकीमध्ये वयाची १८ वर्षे पुर्ण करणारी व्यक्ती मतदान करते तर वयाची २१ वर्षे पुर्ण करणारी इंग्लंडची नागरीक असलेली व्यक्ती या सभागृहाची निवडणूक लढवू शकते.

हाऊस ऑफ कॉमन्स चा कार्यकाल सुरुवातील निश्चित नव्हता पुढे ३ वर्षे ७ वर्षे बदलत गेला १९११ च्या कायद्यान्वये तो पाच वर्ष निश्चित असुन दर पाच वर्षानी निवडणुका होतात असे असले तरी अनेकदा पाच वर्ष संपण्यापुर्वी मध्यावधी निवडणुका झालेल्या आहेत.

निवडुन आलेले सर्व सभासद एकत्र बसुन चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेतात यालाच सभागृहाचे अधिवेशन म्हणतात.वर्षातुन एक अधिवेशन व्हावे असे संकेत आहे.परंतु दोन अधिवेशनादरम्यानचा कालावधी सहा महिन्यापेक्षा अधिक असु नये या संकेताने वर्षातुन दोन अधिवेशने होतात. अधिवेशना दरम्यान सभागृहात विधेयके मांडली जातात, चर्चा विनीमय होतो, मंजुर किंवा नामंजुर केली जातात. येथे सभागृहाचे कामकाज सुरु होण्यासाठी चाळीस सभासदांची उपस्थिती आवश्यक असते. बहुमताने विधेयके मंजुर होतात.

अधीवेशना दरम्यान कार्याचे संचालन करण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांमधूनच सभापतीची निवड होते त्याला 'स्पीकर' म्हणतात.स्पीकरचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो परंतु निर्माण झालेल्या संकेतानुसार ईच्छा असेपर्यंत तो पदावर राहु शकतो त्यामुळेच पुन्हा स्पीकर बनायचे असल्यास येथील प्रथेनुसार त्याला बिनविरोध निवडुन

दिल्या जाते व पुन्हा निवडणुकीनंतर कॉमन्स सभागृहाच्या पहिल्या बैठकीत स्पीकर म्हणुन त्याची निवड केल्या जाते. कार्यक्रम पत्रीका तयार करणे, सदस्यांना बोलण्याची परवानगी देणे, सभागृहासमोर विधेयके मांडणे, निर्णायक मतदान करणे इ.कार्ये त्याला करावी लागतात.

**पार्लमेंटची अधिकार व कार्ये :-**

इंग्लंडमध्ये द्विगृही पार्लमेंट अस्त्विात असुन पार्लमेंटला विभिन्न क्षेत्रात कार्य करावी लागतात येथे सुरवातीला 'हाऊस ऑफ लॉर्डस' हे एकच सभागृह असल्याने शक्तीशाली होते परंतु पुढे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे कॉमन्स सभागृह अस्तित्वात आले आणि लॉर्डस सभागृहाचे १९११ व १९४९ च्या कायद्यान्वये अधिकार कमी करण्यात येवुन कॉमन्स सभागृहाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याने अधिकारांच्या दृष्टीने हाऊस ऑफ कॉमन्स शक्तीशाली बनले. पार्लमेंटच्या दोनही सभागृहांना पुढील अधिकाराअंतर्गत विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात.

**कायदे विषयक अधिकार :-**

या अंतर्गत कायदा तयार करण्याचा अधिकार पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांना आढळतो. त्यादृष्टीने सभागृहात विधेयक मांडणे, चर्चा करणे, मतदान करणे विधेयकाला मंजुर करणे किंवा रद्द करण्याची कार्ये सभासदांना पार पाडावी लागतात. हाऊस ऑफ लॉर्डस कडुन आलेल्या विधेयका संदर्भात कॉमन्स सभागृहाला तर कॉमन्स सभागृहाकडुन आलेल्या विधेयकासंदर्भात लॉर्डस सभागृहाला निर्णय घ्यावा लागतो. पार्लमेंटच्या विश्रांती काळात काढलेल्या अध्यादेशावर चर्चा करुन ते मंजुर किंवा नामंजुर करणे अशी कार्य पार पाडावी लागतात. या अंतर्गत कॉमन्स सभागृह लॉर्डस च्या विधेयकात कितीही दुरुस्त्या करु शकत असल्याने ते शक्तिशाली बनले आहे.

**कार्यकारी अधिकार :-**

विधिमंडळाला विधी तयार करण्याबरोबरच कार्यकारी विभागावर म्हणजेच मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे त्या दृष्टीने मंत्र्यांना सभागृहात मंत्र्यांना प्रश्न उपप्रश्न विचारणे, स्थगन प्रस्ताव, अविश्वास ठराव, लक्षवेधी सुचना, काम रोको प्रस्ताव मांडणे इत्यादी कार्ये दोन्ही सभागृहाच्या सभासदांना पार पाडावी लागतात. या मधे अविश्वास ठरावाव्दारे मंत्रिमंडळाला पदमुक्त करण्याचा अधिकार फक्त कॉमन्स सभागृहाला असल्याने ते शक्तिशाली ठरते.

**आर्थिक अधिकार :-**

या अंतर्गत देशाचे अर्थविधेयकावर विचार विनीमय करणे, मंजुर किंवा नामंजुर करणे दुरुस्त्या सुचविणे तसेच नवीन आर्थिक योजनांना मान्यता देणे अशी कार्ये करावी लागतात. येथे अर्थविधेयक प्रथम हाऊस ऑफ कॉमन्समध्येच मांडल्या जाते तसेच कोणते विधेयक अर्थविधेयक आहे हे कॉमन्स सभागृहाचा सभापतीच ठरवितो. कॉमन्स सभागृहाने मंजुर केलेल्या अर्थविधेयकाला लॉर्डस सभागृहाला चौदा दिवसांच्या आत मंजुरी दयावीच लागते. या दृष्टीने कॉमन्स सभागृह श्रेष्ठ ठरते.

**न्यायविषयक अधिकार :-**

या अंतर्गत लॉर्डस सभागृह देशाचे सर्वोच्च न्यायालय म्हणुन न्यायविषयक कार्य पार पाडते. त्यामध्ये दिवाणी व फौजदारी व्यवस्थेतील वरीष्ठ न्यायालयांकडुन आलेल्या खटल्यांवर निर्णय देण्याचे कार्य होते. हा अधिकार कॉमन्स सभागृहाला नाही. इ. महत्वपूर्ण कार्ये पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांना पार पाडावी लागतात या बरोबरच जनतेच्या तक्रारी मांडण्याचे सुध्दा ते एक व्यासपीठ आहे.

हाउस ऑफ कॉमन्सचा सभापती:-

ब्रिटिश पार्लमेंट अंतर्गत हाउस ऑफ लॉर्डस सभागृह शक्तिशाली बनल असून ब्रिटनमध्ये पार्लमेंटची सर्वोच्चता प्रस्थापित झालेली आढळते प्रत्यक्षात लॉर्डस सभागृह अधिकाराच्या दृष्टीने शक्तिहीन बनल्याने हाउस ऑफ कामन्स या सभागृहाचीच सर्वोच्चता निर्माण झालेली आहे. आज जगामध्ये अधिकाराच्या दृष्टीने कॉमन्स सभागृह हे सर्वात शक्तिशाली आढळते. अशा या सभागृहाचे संचालन करण्यासाठी सभापती पदाची निर्मिती झालेली असुन त्याला स्पिकर असे संबोधल्या जाते.

ब्रिटनमध्ये स्पिकरचे पद हे महत्वपुर्ण व वैशिष्टपुर्ण बनले आहे त्या दृष्टीने या सभागृहाचा आढावा घेतांना या पदाचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**सभापतीची नियुक्ती :-**

सभागृहाच्या सभापतीची नूमणुक करण्याचा अधिकार सभागृहाच्या सदस्याना असुन हाउस ऑफ कॉमन्स च्या निवडणुकीनंतर होणाज्या पहिल्या बैठकीमध्ये सभागृहाचे सदस्या आपल्या सभापतीची निवड करतात प्रमुख्याने सत्तारुढ पक्ष्याच्या उमदेवाराचीच बहुमतामुळे सभापती पदी निवद होते. परंतु इंग्लडमध्ये शक्यतो सत्तारुढ व विरोधी पक्ष दोघांच्या समन्वयाने सभापतीची बिन विरोधी निवड केली जाते.

**सभापतीची पात्रता :-**

सभापती हा सभागृहाच्या सदस्यांमधुन निवडल्या जात असल्याने हाउस ऑफ कॉमन्स सभागृहाचा सदस्य बनण्यासाठीचीच पात्रता सभापती पदाकरीता आवश्यक आहे.

**सभापातीचा कार्यकाळ व नि. पक्षस्वरुप :-**

कार्यकाळा अंतर्गत सुध्दा सभागृहा एवढा म्हणजेच पाच वर्षाचा सभापतीचा कार्यकाळ आसतो. परंतु इंग्लडमध्ये सभापतीच्या कार्यकाळ सदर्भात निर्णय झालेल्या "ईच्छा असेपर्यत पदावर राहने" या प्रयेनूसार जर सभापतीची पुन्हा त्याच पदावर कायम रहाण्याची ईच्छा असेल तर निवडनुकीनंतर त्याची पुन्हा सभापतीपदी निवड केल्या जाते यामुळे एकच व्यक्ती अनेक वर्षे सभापती म्हणून कार्यरत राहिलेल्या आढळतात. येथे महत्वाचे म्हणजे पुन्हा सभापती बनण्यासाठी सबंधित व्यक्तीला सभापतीला त्याच्या मनदारसंघातुन बिनविरोधी निवडुन दिल्या जाते यामुळे व पहील्यादार सभापती बनल्यानंतर आपल्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देतो . त्यामुळे तो खज्या अर्थाने निपक्ष असलेल्या आढळतो.

**सभासदाची पदमुक्ती :-**

येथे कॉमन्स सभागृहाचे सभासद ज्याप्रमाणे त्याची निवड करतात त्याच प्रमाणे गंभिर गन्हासाठी (देशद्रोह,घटनाभंग) त्याला बहुमताने पदमुक्त सुध्दा करु शकतात.

अशा तज्हेने सभापतीपदाची व्यवस्था आढळते.

**सभापतीचे कार्ये:-**

हाउस ऑफ कॉमन्स या शक्तीशाली सभागृहाचा अध्यक्ष/सभापती या दृष्टीने सभापतीला सभागृहासंदर्भात पुढील महत्वपुर्ण कार्ये पार पाडावी लागतात.

१. सभागृहाच्या अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका तयार करणे व अमलबजावणी करणे
२. सभागृहाच्या संबंधित नियमाची अमलबजावनी करणे.
३. सभागृहात सभासदांना बोलण्याची परवानगी देणे.
४. विधेयके चर्चेस/मतदानास टाकने .
५. विधेयकावरील मतदानाचा निर्णय जाहीर करणे.
६. सभागृहाच्या प्रतिव्हेचे रक्षण करणे.
७. गोंधळ घालणाज्या सदस्यावर कारवाई करणे.

८. विराधी पक्षाच्या तसेच अल्पसंख्यांक पक्षाच्या सदस्याचे संरक्षण करणे.

९. अर्थविधेयक कोणते हे ठरविणे व अर्थविधेयक मांडण्यास परवानगी देणे.

१०. दोन्ही सभागृहाच्या सयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविने.

११. निर्णायक मत देणे.

१२. विधेयक विचारविनीमयासाठी समितीकडे पाठविणे.

अशा तऱ्हेने कॉमन्स सभागृहाच्या सभापतीला विभिन्न अधिकार व कार्य पार पाडावी लागतात.

**सभापतीचे स्थान किंवा भुमिका :-**

सभापतीची कार्ये लक्षात घेतल्यानंतर इंग्लडमध्ये सभापतीचे स्थान महत्वपुर्ण व वैशिष्टपुर्ण बनले आहे करण येथे सभापती आपली ईच्छा असपर्यत पदावर राहु शकतो. तसेच त्याला बिनविरोधी निवडुन दिल्या जात तो खऱ्या अर्थाने निप क्ष राहतो.

अनेक वर्षे सभापती पद राहत असल्याने त्याचे संपुर्ण सभागृहावर नियंत्रण प्रस्थापीत होते. शक्तीशाली सभागृहाचा प्रमुख म्हणुन इंग्लडमध्ये त्याला महत्वपुर्ण स्थान प्राप्त झालेले आढळते.

**पार्लमेंटमधील कायद्याची प्रक्रिया :-**

संसदीय पध्दती कायदा करणे हे कायदेमंडळाचे प्रमुख कार्य असून इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस या दोन सभागृहांना विधेयक मंजूर केल्यानंतर राजाच्या/राणीच्या (सर्वभौमत्वाच्या) संम्मतीसाठी पाठविण्यात येते तेथे निर्माण झालेल्या संकेतानुसार राजा पार्लमेंटच्या विधेयकाला विरोध करु शकत नाही. सर्व सामान्य विधेयक कुठल्याही सभागृहात प्रथम मांडल्या जाते. आणि तेथे प्रथम वाचन, द्वितीय वाचन, समिती अवस्था, तृतीय वाचना नंतर सभागृहाची मंजुरी प्राप्त झाल्यास दुसऱ्या सभागृहाकडे पाठविले जाते. आणि तेथे सुध्दा वरील प्रक्रियेनुसार विधेयक मंजुर झाल्याने राजा/राणी कडे अंतिम मंजुरीसाठी पाठविल्या जाते.येथे अर्थविधेयक केवळ हाऊस ऑफ कॉमन्स मध्येच प्रथम मांडल्या जाते.आणि तिथे मंजुर झाल्यानंतर हाऊस ऑफ लॉर्डस कडे पाठविल्या जाते.

**पार्लमेंटमधील समिती पध्दती :-**

आजच्या काळात लोकशाही व्यवस्थांनी कल्याणकारी स्वरुप स्वीकारल्याने पार्लमेंटचे कामकाज वाढले आणि अधिवेशनाचा मर्यादीत कार्यकाल व सभागृहातील

मोठी सभासदसंख्या यामुळे प्रत्येक विधेयकावर सविस्तर विचार विनिमय होवू शकत नाही त्यामुळे विधीमंडळाअंतर्गत विभिन्न विषयावर समित्या निर्माण करण्यात येतात.

इंग्लंडमध्ये सुध्दा अश्या विभिन्न समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये संपुर्ण सदन समिती, स्थायी समिती, प्रवर समिती, अधिवेशन समिती, संयुक्त समिती, या विभिन्न समित्या दोन्ही सभागृहातील असतात सभागृहात विधेयकाचे प्रथम व द्वितीय वाचन झाल्यानंतर विधेयक समितीकडे जाते. समिती अवस्था ही कायदा निर्मितीतील महघ्त्वाची प्रक्रिया आहे कारण समिती अवस्थेकडे विधेयक आनल्यानंतर समितिने विधेयकाला नामंजुर केल्यास विधेयक रद्द होते.इंग्लंडमध्ये मोठया प्रमाणात येथेच विधेयक रद्द होतात.

**ब्रिटिश पार्लमेंट (कायदेमंडळ)**

१. ब्रिटिश कायदेमंडळाला काय म्हणतात ?

अ) संसद ब) पार्लमेंट

क) डयुमा ड) कॉग्रेस

२. ब्रिटिश पार्लमेंटची दोन सभागृह कोणती ?

अ) प्रतीनीधी व सीनेट ब) राष्ट्रीय मंडळ व राज्यसभा

क) हाऊस ऑफ लॉर्डस व हाऊस ऑफ कॉमन्स

ड) यापैकी नाही

३. इंग्लंडच्या पार्लमेंटचे प्रथम व कनिष्ठ सभागृह कोणते ?

अ) हाऊस ऑफ कॉमन्स ब) हाऊस ऑफ लॉर्डस

क) लोकसभा

ड) हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव

४. उमराव सभागृह कोणत्या सभागृहाला संबोधल्या जाते.

अ) कॉमन्स ब) रिप्रेझेंटिव

क) सिनेट ड) लॉर्डस

५. ब्रिटनमधील जनतेचे सभागृह कोणते ?

अ) प्रतिनिधी ब) लोकसभा

क) कॉमन्स ड) राष्ट्रीय मंडळ

६. लॉर्डस सभागृहात कोणत्या प्रकारचे सदस्यत्व मोठ्या प्रमाणात असते.

अ) वंश परांपरागत ब) लॉ-लॉर्डस

क) आजीवन ड) स्कॉटलंड

७. लॉर्डस सभागृहात किती लॉ. लॉर्डस असतात.

अ) पाच ब) नऊ क) दहा ड) बारा

८. लॉर्डस सभागृहाचा कार्यकाल किती.

अ) पाच वर्ष ब) सहा वर्ष

क) स्थायी ड) यापैकी नाही

९. लॉर्डस सभागृहाच्या सभापतीला काय संबोधतात.

अ) चांन्सलर ब) स्पिकर

क) पंतप्रधान ड) यापैकी नाही

१०. हाऊस ऑफ कॉमन्स सभागृहाचा कार्यकाळ किती.

अ) चार वर्ष ब) पाच वर्ष

क) सहा वर्ष ड) दोन वर्ष

११. इंग्लडमध्ये मतदाराची वयोमर्यादा किती.

अ) २१ वर्ष ब) २० वर्ष

क) १८ वर्ष ड) २५ वर्ष

१२. हाउस ऑफ कॉमन्स सभागृहाचा सभासद बनण्यासाठीची वयोमर्यादा किती.

अ) २१ वर्ष ब) २५ वर्ष

क) ३० वर्ष ड) यापैकी नाही

१३. लॉर्ड चान्सलरची नियुक्ती कोण करते.

अ) राजा/राणी ब) पंतप्रधान

क) स्पिकर ड) यापैकी नाही

१४. हाऊस ऑफ कॉमन्स सभागृहाच्या सभापतीची निवड कोण करते.

अ) राजा / राणी ब) मंत्रीमंडळ

क) पंतप्रधान ड) कॉमन्स सभागृहातील सदस्य

१५. ब्रिटनमध्ये धनविधेयक प्रथम कोणत्या सभागृहात मांडल्या जाते.

अ) कॉमन्स ब) लॉर्डस

क) प्रतिनिधी ड) लोकसभा

१६. हाऊस ऑफ लॉर्डसची गणसंख्या किती.
अ) तिन ब) पाच
क) दहा ड) विस

१७. लॉर्डस सभागृहात विधेयक मंजुरीसाठी कमीत कमी किती सभासदाची मंजुरी आवश्यक असते.
अ) दहा ब) विस
क) तिस ड) चाळीस

१८. धनविधेयकाला लॉर्डस सभागृह किती दिवस विलंब लावू शकते ?
अ) १५ दिवस ब) १४ दिवस
क) २० दिवस ड) ३० दिवस

१९. ब्रिटनमध्ये कुणाचे सार्वभौमत्व प्रस्थापीत झाले आहे ?
अ) राजाचे ब) घटनेचे
क) पार्लमेंटचे ड) यापैकी

२०. ब्रिटीश पार्लमेंटचे शक्तिशाली सभागृह कोणते ?
अ) कॉमन्स ब) लॉर्डस
क) दोन्ही समान ड) यापैकी नाही

२१. कार्यकाल संपण्यापुर्वी कॉमन्स सभागृहाचे विसर्जन केव्हा होते ?
अ) मंत्रीमंडळाचे कॉमन्स सभागृहात बहुमत न राहिल्यास
ब) लॉर्डस सभागृहात बहुमत न राहीलयास
क) प्रधानमंत्र्याने राजीनामा दिल्यास ड) यापैकी नाही

२२. ब्रिटनमध्ये कोणते सभागृह सर्वोच्च न्यायालय म्हणुन कार्य करते ?
अ) कॉमन्स ब) लॉर्डस
क) सिनेट ड) यापैकी नाही

२३. ब्रिटनमध्ये वर्षातुन पार्लमेंटची किती अधिवेशने व्हावी असा संकेत आहे ?
अ) तिन ब) दोन
क) एक ड) चार

२४. संकेतानुसार दोन अधिवेशनादरम्यानचा कालावधीकिती महिन्यापेक्षा जास्त नसावा.
अ) सहा ब) पाच क) चार ड) तिन

२५. हाऊस ऑफ कॉमन्सची सभासद संख्या किती ?

अ) ६०० ब) ६५० क) ६७५ ड) ७००

२६. कॉमन्स सभागृहाच्या सभासदांची निवड कोणामार्फत होते ?

अ) जनतेमार्फत ब) राजा व राणी

क) मंत्रिमंडळ ड) यापैकी नाही

२७. कॉमन्स सभागृहाचे सदस्य कोणत्या पध्दतीने निवडले जातात ?

अ) अप्रत्यक्ष ब) प्रत्यक्ष गुप्त मतदान जनतेद्वारा

क) राजाद्वारे नियुक्त ड) यापैकी नाही

२८. कॉमन्स सभागृहाच्या सभापती संदर्भात कोणता संकेत रुढ झालेला आहे.

अ) इच्छा असेपर्यंत निवडुन देणे

ब) पाच वर्षानंतर पुन्हा निवडुन येता येणार नाही

क) एक व्यक्ती दोन वेळाच सभापती बनु शकते ड) यापैकी नाही

२९. कोणत्या कायद्याद्वारे कॉमन्स सभागृहाचे अधिकार वाढतेल ?

अ) १८१८ व १८३२ ब) १९३१ व १९४५

क) १९११ व १९४९ ड) यापैकी नाही

३०. कॉमन्स सभागृहाची गणसंख्या किती ?

अ) ४० ब) ५०

क) ६० ड) ७०

३१. ब्रिटनमध्ये वर्षातुन पार्लमेंटची किती अधिवेशने होतात ?

अ) दोन ब) चार क) पाच ड) सहा

३२. जगातील द्वितीय सभागृहांमध्ये सर्वात शक्तीहीन सभागृह कोणते ?

अ) राज्यसभा ब) सीनेट

क) लॉर्डस ड) यापैकी नाही

❑❑❑

# 5

# ब्रिटनची न्यायव्यवस्था

## (Judiciary)

इंग्लंडमध्ये १३ व्या शतकाच्या प्रारंभीच न्यायालये निर्माण झालेली होती.तथापि कनिष्ठ न्यायालय, वरिष्ठ न्यायालय अशी न्यायालयांची एकसूत्र स्वरुपाची रचना प्रारंभीच्या काळात नव्हती.१८७३ ते १८७६ मध्ये न्यायालयाची फेररचना करण्यात आली.या फेररचनेनुसार ब्रिटीश न्यायालयाचे दिवाणी न्यायालये व फौजदारी न्यायालय असे दोन गट पाडण्यात आले आहेत.अशा प्रकारे १८७३ ते १८७६ या काळात करण्यात आलेल्या ब्रिटीश न्यालयाच्या रचनेचे स्वरुप आजही कायम आहे.दिवाणी व फौजदारी न्यायालयांच्या रचनेचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

**दिवाणी न्यायालय :**

१) काउंटी न्यायालय :- दिवाणी खटल्यांची सुनावणी करणारे हे कनिष्ठ स्तरावरील न्यायालय होय. काउंटी न्यायालयामध्ये ४०० पौंड किमतीपर्यंतच्या खटल्यांची सुनावणी होते.

२) सर्किट न्यायालय :- इंग्लंडची विभागणी एकुण ५५ सर्किटमध्ये म्हणजे विभागांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक सर्किटमध्ये एक न्यायालय निर्माण करण्यात आले होते. या न्यायालयाला सर्किट न्यायालय असे संबोधिले जाते. या सर्किट न्यायालयामध्ये प्रामुख्याने काउंटी न्यालयातून येणाज्या खटल्यामध्ये पुर्ननिर्णय देण्याचे कार्य केले जाते.

३) सुप्रिम कोर्ट ऑफ ज्युडीकेचर :- या न्यायालयाची रचना दोन भागात केली आहे. यातील एका भागाला हायकोर्ट ऑफ जस्टीस असे म्हणतात. या न्यायालयाचे १) चान्सरी २) बेंच ऑफ किंग ३) प्रोबेट, डायव्हर्स व ॲडमिरस्टी असे तीन उपविभाग आहेत. या उपविभागांमध्ये विमा, कर्जवसुली, संपत्ती, मृत्यूपत्र, विवाह संबंधी मधील

घटस्फोट इत्यादीशी संबंधीत खटल्यांची सुनावणी होते. या तीनही भागातील न्यायधिशांची नियुक्ती लॉर्ड चान्सेलरकडुन केली जाते. दुसरा विभाग म्हणजे कोर्ट ऑफ अपील होय हायकोर्ट ऑफ जस्टीसच्या तीनही विभागातून आलेल्या खटल्यांमध्ये पुर्ननिर्णय देण्याचे कार्य हे न्यायालय करते.

**फौजदारी न्यायालये :-**

दिवाणी न्यायालयाच्या रचनेत वर उल्लेख केल्याप्रमाणे तीन स्तर असले तरी फौजदारी न्यायालयांच्या रचनेत पुढीलप्रमाणे पाच स्तर आहेत.

१) पेटी कोर्ट ऑफ सेशन्स :- हे न्यायालय सर्वात कनिष्ठ पायरी आहे. स्थानिक स्तरावर होणाऱ्या किरकोळ स्वरुपाच्या गुन्हयाशी संबंधित खटल्यांची सुनावणी.

२) पेटी सेशन्स कोर्ट : गंभीर स्वरुपाच्या फौजदारी दाव्याची सुनावणी या न्यायालयामध्ये केली जात. ५० ते १०० पौंड दंड व ६ महिन्यापर्यंत कारावासाची शिक्षा देण्याचा अधिकारी या न्यायालयांना आहे.

३) कोर्ट ऑफ क्वार्टर सेशन्स :- हे न्यायालय काउंटी कोर्टाच्या दर्जाचे आहे व उल्लेखीत दोन्ही न्यायालयातील खटल्यांवर पुर्ननिर्णय देण्याचे कार्य हे न्यायालय करते.

४) कोर्ट ऑफ असाईजेस : कोट ऑफ क्वार्टर सेशन्स मधील निर्णयांवर पुन्हा निर्णय देणे हे या न्यायालयाचे प्रमुख कार्य होय हे फिरते न्यायालय आहे.

५) कोर्ट ऑफ क्रिमीनल अपील : कनिष्ठ स्तरावरील फौजदारी न्यायालयांनी दिलेल्या निर्णयावर या न्यायालयात अपील केले जाते. फौजदारी खटल्यांमध्ये या न्यायालयाने दिलेला निर्णय जवळपास अंतीम स्वरुपाचा असतो. त्यामुळे फौजदारी न्यायालयांच्या रचनेत या न्यायालयाला महत्वपुर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

**हाउस ऑफ लॉडर्स (सर्वोच्च न्यायालय) :**

न्यायालयीन रचनेतील अंतिम न्यायालय म्हणजे हाउस ऑफ लॉर्डस होय दिवाणी व फौजदारी न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द केवळ महत्वपुर्ण खटल्यांची सुनावणी या न्यायालयात होते.हाऊस ऑफ लॉर्डस हे इंग्लंडमधील अंतिम न्यायालय असेल तरीही सभागृहातील सर्व सभासदांसमोर कोणत्याही खटल्यांची सुनावणी होत नाही.पुर्ननिर्णयासाठी आलेल्या खटल्यांची सुनावणी सभागृहातील नऊ विधी (लॉ) लॉर्डस समोर होते.ब्रिटीश न्यायव्यवस्थेत अंतीम न्यायालय म्हणून हाऊस ऑफ लॉडर्स हे ब्रिटीश न्यायव्सवस्थेच्या रचनेचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय आहे.

**न्यायदान प्रक्रिया :-**

इंग्लडमध्ये खुली न्यायदान प्रक्रिया अस्तित्वात असून सुरवातीपासुनच न्यायालयांनी आपले निष्प:क्ष स्वरुप कायम ठेवलेले आहे. या न्यायदान प्रक्रियेअंतर्गत न्यायधीश, ज्युरी, वादी, प्रतिवादी, सॉलीसिटर, अॅडव्होकेट इत्यादींचा समोवशअसून गुन्ह्यामागच्या सामाजिक, सांस्कृतीक पृष्ठ भुमिचा सुध्दा न्यायदान करतांना विचार केल्या जातो. सर्वसाधारणपणे खटला कसा दाखल करायचा हे ज्युरी ठरवितात तर सॉलीसिटर खटला दाखल करुन घेतो व अॅडव्होकेट खटला लढवितो येथे अटरणी सुध्दा असतात.त्यांचे स्वतंत्र ऑफिस असते.कायदा रुढी, प्रथा, परंपरा या सर्व बाबी लक्षात घेवून न्यायधिश व ज्युरी निर्णय घेतात ज्युरी पध्दती हे येथील न्यायव्यवस्थेचे महत्वपुर्ण वैशिष्टय ठरलेले आहे.कारण येथे ज्युरींनी शासनाच्या विरोधात सुध्दा निर्णय दिलेल आढळतात.

**५. ब्रिटनमधील राजकीय पक्ष व पक्षपध्दती, दबावगट व हितसंबंधी गट**

**राजकिय पक्ष व पक्षपध्दती :**

इंग्लंडच्या लोकशाही व्यवस्थेचे हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.लोकशाही यशस्वी होण्यासाठी पक्षपध्दती आवश्यक घटक आहे हीचा चौथा आधारस्तंभ असे म्हणतात.इंग्लंडमध्ये काळाच्या ओघामध्ये पक्षपध्दतीचा विकास होत गेलेला आहे. येथील पक्षपध्दतीचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे सुरवातीला पक्ष अस्तित्वात आले आणि नंतर पध्दती अस्तीत्वात आली यानुसार येथे स्टुअर्ट राजाचे काळात संसदेची जी सर्वोच्यत्ता प्रस्थापीत झाली ज्यासाठी जनतेने प्रदिर्घ लढा दिला, संघर्ष केला त्यात राजाचा समर्थक वर्ग व राजाचा विरोधक गट अस्तित्वात आले. पुढे हया गटांना व्हिग व टोरी ही नावे मिळालित टोरी म्हणजे राजाचा समर्थक गट तर व्हिंग म्हणजे राजाचाविरोधी गट गटांच्या संघर्षातून जनतेचा विजय होवून संसद सार्वभौम बनली नंतर या गटांचे रुपांतर राजकिय पक्षामध्ये झाले नंतर टोरी गटाला कॉन्झर्वेटिव्ह (हुजुर) पक्ष असे नांव पडले यामध्ये पुराणमतवादी, भांडवलदार, राजेशाहीचे समर्थक, चर्चचे आधिकारी इ. समावेश आहे.तर व्हिंग गटाचे (Libral) उदारमतवादी पक्षामध्ये रुपांतर झाले यात सामान्य लोकांचा समोवश असून लोकमतानुसार परिवर्तन व्हावे ही त्यांची अपेक्षा आहे.

पुढे उदारमतवादी (Libral) पक्षात १८८६ मध्ये फुट पडली युनिमनिस्ट स्वतंत्र पक्ष निर्माण झाला इ.स.१९०० मध्ये मजुर पक्षाचा उदय झाला व १९२४ मध्ये मजुर पक्षाला सरकार बनविण्याची संधी प्राप्त झाली. पुढे हुजूर आणि मजूर या दोनच पक्षांकडे

आळीपाळीने सत्तागेली त्यातून द्विपक्ष पध्दती अस्तित्वात आली तरी येथील राजकारणात निवडणुकीच्या वेळेस अनेक पक्ष अस्तीत्वात येतात आणि लयास जातात.

**अ) इंग्लंडमधील प्रमुख पक्ष :**

१) हुजुर पक्ष (रुढीवादी, पुराणमतवादी पक्ष) (Conservative Party)

टोरी म्हणून ओळख असलेल्या गटाचे रुपांतर म्हणजे हुजुर पक्ष होय यामध्ये रुढीवादी, सावकार, भांडवलदार, व्यापारी, धर्म गुरु, राजघराण्यातील व्यक्ती यांचा समावेश आहे.या पक्षाचे पुराणमतवादी संस्था टिकून राहव्यात असे मत आहे.परंतु परिवर्तनाला सुध्दा हा पक्ष समर्थ देतो.

२) उदारमतवादी पक्ष (Libbral)

पूर्वीच्या व्हिंग या गटाचे रुपांतर या पक्षात झाले यामध्ये प्रामुख्याने सर्वसामान्यांचा समावेश होता कॉमन्स सभागृहाच्या निर्मितीनंतर या पक्षाचे महत्व वाढले मात्र पुढे मजुर पक्षाच्या निर्मितीनंतर याचे महत्व कमी झाले. या पक्षाने मध्यम मार्ग स्वीकारुन भांडवलवाद व समाजवाद या दोन्ही मार्गाचा अवलंब केला.

३) मजुर पक्ष (Labour)

इ.स.१९०० साली या पक्षाचा उदय झाल मध्यमवर्ग तसेच शिक्षण वर्गाचा यामध्ये मोठया प्रमाणात समावेश असुन मजुरांचे कल्याण, शांततामय मार्गाने समाजवाद, राष्ट्रीयकरण, साम्राज्यवाद इ.यापक्षाची भुमिका आहे.

या महत्वपुर्ण पक्षांशिवाय साम्यवादी, समाजवादी, स्वतंत्र्य पक्ष नो नथींग पार्टि इ.पक्ष सुध्दा उदयास आलेत परंतु जनतेचे त्यांना फारसे समर्थन लाभले नाही.

**ब) पक्षाचे संघटन :-**

इंग्लंडमध्ये सर्व पक्षांचे संघटन जवळपास समान आहे.संसद (पार्लमेंट) व संसदेबाहेर या पक्षाचे संघटन असते पार्लमेंट मधील संघटनांतर्गत पार्लमेंटमध्ये निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असतो. पार्लमेंट बाहेर कार्य करण्यासाठी राष्ट्रीय संघटनेची निर्मिती झालेली असते या अंतर्गत राष्ट्रीय व स्थानिक दोन विभागांची निर्मिती झालेली असून पक्षांचे कार्यालय लंडन येथे असते पक्षांचे अधिवेशन दरवर्षी भरते.

**क) राणी सरकारचा विरोधी पक्ष :-**

इंग्लंडमध्ये यास महत्वपुर्ण स्थान प्राप्त झालेले असून लोकशाही यशस्वीतेसाठी ते आवश्यक आहे.सत्ताधिशांच्या चुका दाखविणे हे याचे कार्य असून विरोधी पक्षामुळे

सरकारच्या हुकुमशाहीवर प्रतिबंध घातला जातो तेथे विरोधी पक्षनेत्याला कॅबीनेट मंत्र्यांच्या दर्जाप्राप्त झालेला आहे.

**इंग्लडमधिल पक्षपध्दतीची वैशिष्टे :-**

इंग्लडमधील राजकीय पक्षपध्दतीचा अभ्यास करतांना येथे पक्षपध्दतीचा विकास काळाच्या ओघामध्ये विकासाच्या प्रक्रियेदरम्यान झालेला आढळुन येतो येथे इतर संस्था प्रमाणेच सुध्दा राजकीय पक्षपध्दतीसुध्दा वैशिष्टपुर्ण आढळते. त्या दृष्टीने त्या पक्षपध्दतीची वैशिष्ट पुढीलप्रमाणे आहेत.

१. व्दिपक्षपध्दती :-

हे येथील राजकीय पक्षपध्दतीचे प्रमुख वैशिष्ट असुन येथे अनेक राजकीय पक्षाची निर्मिती होउन सुध्दा व्दिपक्षपध्दती हे वैशिष्ट आहे. इंग्लंडमध्ये सुरुवातीला राजेशाही होती पुढे राजेशाहीचे निर्यत्रित राजेशाहीत रुपांतर झाले. व राजाच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात एक वर्ग अस्तित्वात आला आणि त्यातुनच राजाला समर्थन करणारा व विरोध करणारा असे दोन गट अनुक्रमे टोरी व व्हिग अस्तीत्वात आलेत पुढे लोकशाही विकासाच्या प्रक्रियेत या गटांचा विकास होत जावुन त्याना राजकीय पक्षाचे स्वरुप प्राप्त झाले आणि सुरुवातीला अनेक वर्षे या दोन टोरी व व्हीग या पक्षाकडेच राजकीय सत्ता आळीपाळीने होती काही कालावधीनंतर या गटांचे मजुर व उदरमजवादी राजकीय पक्ष म्हणुन स्वरुप बनले व इ. १९०० मध्ये अनेक कामगार संघटना एकत्रित येवुन मजुर पक्षाची (labour) स्थापना झाली. व राजकीय पक्षाला ब्रिटीश राज्यव्यवस्थेत मोठे सामर्थ मिळाले आणि उदारमतवादी (libaral) पक्षाचे समर्थन कमी होवुन त्याचे मजुर पक्षात विलिनीकरण झाल्याने ब्रिटीश व्यवस्थेत मजुर (conservatice labour) मजुर पक्ष प्रमुख बनलेत अशा तऱ्हेने येथे सतत दोनच राजकीय पक्षांना मोठे जनसमर्थन मिळत गेल्याने व्दिपक्षपध्दती येथील राजकीय पक्षपध्दतीचे वैशिष्ट बनले.

२. विचारसरणीतील भिन्नता :-

येथे प्रमुख असलेल्या दोन्ही राजकीय पक्षांच्या विचारसरषिमध्ये भिन्नता आढळते हुजुर पक्ष भाडवलशाहीचे राजेशाहीचे समर्थन करतो. तर मजुर पक्ष राजेशाहीला विरोध करुन साम्यवादी विचारसरणीचे समर्थन करतांना आढळतो.

३. समन्वयाची भुमिका :-

ब्रिटनमध्ये प्रमुख राजकीय पक्षांअतर्गत विचारसरणीमध्ये भिन्नता आढळत असली तरी त्याच्यातील मदभेद संघर्ष निवडणुकीत पुरतता राहते निवडणुकीत तर विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षाला पुर्णपणे सहकार्य करतो. विरोधासाठी विरोध करत नाही.

४. राष्टीय प्रश्नांवर मक्तैय :-

येथे राजकीय पक्षांच्या विचारसरणीत भिन्ता असली तरी राष्ट्रीयदृष्टा देशहिताच्या प्रश्नांबाबत त्यांचे एकमत आढळते. देश हितापुढे पक्षीय भुमिका दुय्यम ठरतात विरोधी पक्ष सुध्दा सरकारला सहकार्य करतात.

५. राज्यव्यवस्थेत महत्वपुर्ण स्थान :-

इंग्लंडमध्ये दोन गटाच्या विकासातुन राजकीय पक्ष पध्दती विकसीत झाली. आणि आज इंग्लडच्या शासन व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तभ बनलेली आढळते येथील संपुर्ण शासन व राजकारण राजकीय पक्षा भोवती क्रेंद्रीत झालेले आढळते त्या दृष्टीने हे वैशिष्ट ठरते.

अशा तऱ्हेने ब्रिटीश राजकीय पक्षपध्दतीची वैशिष्टे आढळून येतात त्यावरून ही पक्षापध्दती वैशिष्टपुर्ण आढळते.

ब्रिटनमधील दबावगट व हितसंबंधीगट (Interest and Pressure groups)

आधुनिक काळात बहुतके व्यवस्थांनी कल्याणकारी स्वरुप स्विकारले आणि त्यातुनच समान हितसंबंध जपण्यासाठी लोकांच्या गटांची निर्मिती व त्यांच्या कार्यात वाढ झालेली आढळते इंग्लंडमध्ये सुध्दा अश्याप्रकारे वेगवेगळे हितसंबंधी गट निर्माण होतात व कालांतराने काही दबावगटांमध्ये रुपांतरीत होतात.

विशिष्ट उद्देशाची पुर्तता करण्यासाठी काही विशिष्ट हितसंबंधीय व्यक्ती एकत्र येतात व गटाची निर्मिती होते तेव्हात्यास हितसंबंधी गट असे म्हणतात तर आपल्या उद्देश पुर्ततेसाठी हे गट ज्यावेळेस कायदेमंडळ, मंत्रीमंडळ यासारख्या व्यवस्थांवर प्रभाव टाकतात दबाव निर्माण करतात तेव्हा त्यास दबाब गट असे म्हणतात. इंग्लंडमध्ये विभिन्न क्षेत्रात दबावगटांची निर्मीती झालेली आहे.

**अ) इंग्लंडमधील दबाव गट :-**

इंग्लंडमध्ये सर्वसाधारपणे आर्थिक हितसंबधाचे प्रतिनिधीत्व करणारे, सहकारी व कामगार संघटनासारखे दबावगट आढळतात याबरोबरच सामाजिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करणारे गट सुध्दा आढळतात याबरोबर वृध्दांचे कल्याण साध्य करण्यासाठी सुध्दा गट निर्माण झालेले आहेत.

सर्वसाधारनपणे येथे पुढील दबाव गट आढळतात.

१) व्यापारी गट : चेंबर ऑफ कॉमर्स, उद्योगपतींचा संघ, राष्ट्रीय चेंबर ऑफ ट्रेड युनियन.

२) कामगार संघटना : रेल्वे कामगार युनियन, खाण कामगार, राष्ट्रीय संघ शेत मजुर युनियन.

३) व्यावसायीक गट : ब्रिटीश मेडीकल असोशिएशन, शासकिय अधिकाऱ्यांचे असो. शिक्षकांची युनियन.

४) ऐच्छीक स्वरुपातील गट : वृध्द, अंध व्यक्तींची काळजी घेणारे गट.

उदा.रॉयल नॅशनल इंस्टिटयूट, नॅशनल कॉन्सील ऑफ सोशल सर्व्हिस याबरोबरच म्युनिसिपल कार्पोरेशन्स, इंस्टीटयट ऑफ इंजीनिअर्स, पेन्सनर्स असो.ब्रिटन बॅकस इ.गट आढळतात.

**ब) दबावगटांची कार्यपध्दती :-**

आज इंग्लंडमध्ये मोठया प्रमाणात दबाव गटांची निर्मिती झालेली असून त्याचा प्रभाव वाढलेला आह.हे दबावगट विभिन्न माध्यमातून राजकीय व्यवस्थेवर आपला प्रभाव निर्माण करतात.यामध्ये पार्लमेंटच्या सदस्यांवर प्रभाव टाकणे, मंत्रिमंडळ सदस्यांवर प्रभाव टाकणे.संप बंद धोरणे आंदोलने इ.प्रकार द्वारा प्रभाव टाकतात.ज्या दबाव गटांचा प्रभाव जास्त पडतो त्याचे वर्चस्व प्रस्थापित होते.उदा. ब्रिटीश ब्रॅकर्स असा.बिटीश मेडिकल असो.इत्यादी गट आढळतात.आता इंग्लंडच्या व्यवस्थे मध्ये दबावगटांना महत्व प्राप्त झालेले आहे की राजकीय पक्ष सुध्दा निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त दबावगटांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करतांना आढळतात.

**न्यायव्यवस्था / पक्षपध्दती /दबावगट, हितसंबंधी गट**

१. ब्रिटीश न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च न्यायालय कोणते ?

अ) लॉर्डस सभागृह ब) कॉमन्स सभागृह

क) स्वतंत्र्य न्यायालय ड) यापैकी नाही

२. दिवाणि न्यायव्यवस्थेतील कनिष्ठ स्तरावरील न्यायायल कोणते ?

अ) काऊंटी न्यायालय ब) सर्किट न्यायालय

क) सुप्रिम कोर्ट ऑफ ज्युडीकेचर ड) यापैकी नाही

३. फौजदारी न्यायव्यवस्थेतील अंतीम न्यायालय कोणते ?

अ) पेटी कोर्ट ऑफ सेशन्स ब) पेटी सेशन्स कोर्ट

क) कोर्ट ऑफ क्वार्टर सेशन्स ड) कोर्ट ऑफ क्रिमीनल अपील

४. ब्रिटीश न्यायव्यवस्थेचे महत्वपुर्ण वैशिष्ट्ये कोणते ?

अ) बंदिस्त न्यायपध्दती ब) स्वतंत्र न्यायपध्दती

क) खुली न्यायपध्दती ड) यापैकी नाही

५. ब्रिटीश न्यायव्यवस्थेचे वेगळेपण कशात आढळते ?

अ) बहुमताने न्याय ब) ज्युरी पध्दती

क) खली पध्दती ड) यापैकी नाही

६. ब्रिटीश राजकीय पक्षपध्दतीचे महत्वाचे वैशीष्ट्ये ?

अ) एकपक्ष ब) द्विपक्ष

क) बहुपक्ष ड) यापैकी नाही

७. राजाचा समर्थक गटाचे नाव कोणते ?

अ) व्हीग ब) टोरी

क) हुजूर ड) मजुर

८. राजाचा विरोधी गट कोणता ?

अ) व्हीग ब) टोरी

क) हुजुर ड) मजुर

९. टोरी गटाला कोणते नाव प्राप्त झाले ?

अ) मजुर ब) उदारमतवादी

क) कॉर्न्झवेटीव (हुजुर) ड) यापैकी नाही

१०. व्हिग गटाचे कोणत्या पक्षात रुपांतर झाले ?

अ) उदारमतवादी ब) मजुर

क) हुजुर ड) नो नथींग पक्ष

११. मजुर पक्षाचा उदय केव्हा झाला ?

अ) १७०० ब) १८००

क) १८५० ड) १९००

१२. ब्रिटनमध्ये भांडवलशाही, रुढीवादी, पुराणमतवादी विचारसरणी कोणत्या राजकीय पक्षाची आहे.

अ) हुजुर ब) मजुर

क) उदारमतवादी ड) यापैकी नाही

१३. ब्रिटीश राजकीय व्यवस्थेत कुणाला महत्वपुर्ण स्थान आढळते ?

अ) दबावगट ब) हितसंबंधी गट

क) राजकीय पक्ष ड) यापैकी नाही

१४. सर्वोच्च न्यायालय म्हणुन हाऊस ऑफ लॉर्डस ला कोणता अधिकार नाही.

अ) दिवाणी खटल्यांवर पुर्ननिर्णय देणे

ब) फौजदारी खटल्यांवर पुर्ननिर्णय देणे.

क) न्यायीक पुर्नविलोकन ड) यापैकी नाही.

❑❑❑